**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८१/२०११.**

श्री. सुरेश शालिकराम दुरुगकर,
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
तहसीलदार,
ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. आर. डी. यामावार, अव्वल कारकून हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिंदेवाही यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून राबविण्यात येणाऱ्या योजना व कुटुंब आर्थिक सहाय्यता लाभ तसेच स्वस्त धान्य दुकानाबाबत व इतर मुद्यांबाबत एकूण १ ते १२ मुद्यांची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सर्व मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार यांचेकडे दिनांक २५.८.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व निर्णय ही दिलेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधींनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.६.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १९.६.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या अर्जात केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचे आदेश पत्र, नस्तीची यादी, प्रकरणे, बँक खात्याशी झालेल्या व्यवहाराचा संपूर्ण तपशील, विवरणपत्रे इत्यादी १२ मुद्यांवर सखोल माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मोठया स्वरुपात असल्यामुळे अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रुपये १२००/- भरण्याबाबत दिनांक २०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. तसेच काही दस्ताऐवजांचे निरिक्षणासाठी आपण स्वतः कार्यालयात उपस्थित राहावे असे देखील कळविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही. म्हणून त्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक ११.८.२०१० च्या पत्राने संक्षिप्त स्वरुपातील माहिती उपलबध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. परंतु बँक खात्याशी झालेल्या व्यवहाराची संपूर्ण तपशील प्राप्त झाला नाही. तसेच बँकेशी संबंधित असलेल्या इतर व्यवहाराची माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डचे अपीलकर्त्याने निरिक्षण केल्यास त्यांना पुन्हा माहिती त्यांच्या अपेक्षेप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरच्या रेकॉर्डचे निरिक्षणाचे संदर्भात अपीलकर्त्याने आयोगासमोर मान्यता दिली. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास रेकॉर्डचे निरिक्षणासाठी तारीख व वेळ कळवावी व रेकॉर्डचे निरिक्षण केल्यानंतर अपीलकर्त्यास बँक खात्याशी झालेल्या व्यवहाराची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी इतर माहिती अपीलकर्त्यास निरिक्षणानंतर पाहिजे असल्यास अपीलकर्त्याने झेरॉक्सचा खर्च करुन ती माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८८२- ८८३ /२.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८०/२०११.**

श्री. सुरेश शालिकराम दुरुगकर,
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. व्ही. आकुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, ता. गोरेगांव, जि. गोंदिया.

श्री. के. बी. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार, ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन तहसीलदार, गोरेगांव या नावाने असलेल्या बँकेंच्या खात्याबद्यलची माहिती, तसेच बँकेकडून मिळणारे खाते निहाय चेक बुकची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. परंतु सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, गोरेगावं यांचेकडे दिनांक १६.११.२०१० रोजी दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्ता यांना पुर्ण माहिती पुरवावी असा आदेश दिला. त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.७.२०१० चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या अर्जात सन २००६ ते दिनांक १५.७.२०१० पर्यंत तहसीलदार या नावाने असलेले गोरेगांव येथे सर्व हेडची बँक देवानघेवान रिर्पाटची प्रत, तसेच बँकेकडून मिळणारे खाते निहाय चेकचे विवरण पत्राची प्रत मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संजय गांधी योजना व नायब नाझर या शाखेची असल्याने त्यांनी दिनांक ३१.७.२०१० रोजी पत्र लिहून त्यांचेकडून माहिती मागितली. त्यांचेकडून दिनांक २१.८.२०१० रोजी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, गोरेगांव कडून माहिती प्राप्त झाली. सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यासाठी टपाल खर्च याकार्यालयात भरणा करण्याबाबत अर्जदारास दिनांक २१.८.२०१० रोजी यु.पी.सी.द्वारे कळविण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक १६.९.२०१० रोजी स्वतः माहिती घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात हजर झाले. बँकेकडून प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास निशुल्क उपलब्ध करुन देण्यात आली. मात्र बँक खात्याची देवान घेवान रेकॉर्डची प्रत त्यांनी मागितली म्हणून सदरची प्रत बँक ऑफ महाराष्ट्र, गोरेगांव यांचेकडे मागितली. त्याला अनुसरुन दिनांक १.८.२०११ रोजी शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी ७१ पानी विवरणपत्राची माहिती त्यांचेकडे उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक १.८.२०११ रोजी उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची दिनांक १.८.२०११ ची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले.

३.	म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.९.२०१० रोजी व दिनांक १.८.२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-		दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८८४- ८८५ /२.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७९/२०११.

श्री. सुरेश शालिकराम दुरुगकर,
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, ता. तिरोडा, जि. गोंदिया.

श्री. ए. एस. सोराखे,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार, ता. तिरोडा, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, तिरोडा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन तहसीलदार, तिरोडा या नावाने बँकमध्ये असलेल्या खात्यांच्या देवान-घेवान (Transation) रिपोर्टची प्रत तसेच बँकेकडून मिळणारे खाते निहाय चेक बुकचे विवरण पत्र इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार यांचेकडे दिनांक १६.११.२०१० रोजी दाखल केले. तथापी प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना अपीलकर्त्याचा दिनांक २१.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १२.८.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या अर्जात तहसीलदार या नावाने असलेले बँक खातेबाबत देवान घेवाणाची रिपोर्टची प्रत तसेच चेकच्या संदर्भात माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक १२.८.२०१० रोजी पत्र पाठवून कळविण्यात आले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार यांचेकडे दाखल केले. तहसीलदार यांचे निर्देशाप्रमाणे अपीलकर्त्यास दिनांक १३.१.२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत मान्य केले. परंतु तहसीलदार यांचे खाते क्रमांक ११५४०७११०९७ स्टेट बँक ऑफ इंडिया, तिरोडा शाखा या खात्याचे संदर्भातील सन २००६-२००७ मध्ये झालेले देवान घेवान (ट्रॉंजक्शन) व्यवहाराची माहिती त्यांना मिळाली नाही. सदरची माहिती बँकेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्टेट बँक ऑफ इंडिया, तिरोडा शाखा येथील तहसीलदार, तिरोडा यांचे खाते क्रमांक ११५४०७११०९७ मध्ये सन २००६-०७ वर्षात झालेल्या बँकेच्या देवान घेवान विवरणाची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८८६- ८८७ /२.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८६/२०११.

श्री. जयवंत मधुकर मिश्रा,
प्लॉट नं. १६, जवाहर कॉलनी,
मु. पो. पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापिका,
ललिताबाई मुरारका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र त्यांनी फॅक्सद्वारे त्यांचा लेखी खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. धनराज तेलंग, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अर्जुन पुरेकर, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र त्यांनी आयोगाकडे फॅक्सद्वारे त्यांचा लेखी खुलासा सादर केलेला आहे व त्या लेखी खुलाश्यात त्यांनी असे नमुद

... २

केले की, त्यांच्या दिनांक २८.२.२०११ च्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ ची माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र मुद्या क्रमांक २ ची माहिती जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडून प्राप्त झालेली नाही. म्हणून त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच संबंधितांवर शास्तीची कार्यवाही करावी असा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पाठविलेला आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले कनिष्ठ लिपिक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.२.२०११ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ४.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक ३१.३.२०११ रोजी यु.पी.सी. पोस्टाद्वारे माहितीचे शुल्क भरणा करण्याबाबत कळविले. तथापी अपीलकर्त्यांने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक १५.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.६.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिकारी हे गैरहजर होते. तसेच त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय पोस्टाने प्राप्त झाला नाही असे कनिष्ठ लिपिक यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत उपशिक्षणाधिकारी यांनी आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीला उपलब्ध करुन दिली.

५. अपीलकर्त्याने फॅक्स संदेशाद्वारे या कार्यालयास पाठविलेला खुलासा अवलोकन केले असता त्यात त्यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांच्या दिनांक ३१.३.२०११ चे शुल्क भरण्याचे पत्र पोस्टाद्वारे प्राप्त झाले नाही म्हणून प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांना मुद्या क्रमांक २ ची माहिती विनामुल्य उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे त्यांनी लेखी खुलाश्यात नमुद केले.

६. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने हजर असलेले प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र पोस्टाने पाठविल्याबाबतचा योग्य तो पुरावा आयोगापुढे सादर केला नाही. म्हणून अपीलकर्त्यास आता विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रथम अपीलाचे निर्णयात देखील अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २ ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २८.२.२०११ च्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ ची माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८८८- ८९० /३.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८८/२०११.

श्री. ईश्वर उपासराव चकोले,
मंगळवारी पेठ, मंगळवारी प्राथमिक शाळेजवळ,
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
ता. उमरेड, जि. नागपूर.

श्री. मोहन चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
ता. उमरेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरेड यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन एम.ई.एस. प्रशिक्षण अंतर्गत एकूण ११

मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे माहितीच्या अर्जात नमुद केले होते. तथापी त्यांना ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरेड यांचेकडे दिनांक १८.४.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. अनिल कदम, प्राचार्य म्हणून हे कार्यरत होते. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांनी तयार केली होती व सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे अपीलकर्त्याने अर्जात नमुद केल्यामुळे सदरची माहिती घेऊन जाण्याबाबत कार्यालयातील दुरध्वनीवरुन अपीलकर्त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांक ९३२५६९६४७८ वर कळविले. तथापी अपीलकर्ता सदरची माहिती घेण्याकरिता व्यक्तिशः त्यांचे कार्यालयात हजर झाले नाही म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.५.२०११ रोजी रजिस्टर पोस्टाने पत्र पाठवून असे कळविले की, आपण माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती तयार असून सदर माहिती घेऊन जाण्याकरिता आपणास अनेकदा दुरध्वनीवरुन कळविण्यात आले तरी आपण माहिती घेण्यासाठी कार्यालयात आले नाही म्हणून आता आपण वरील माहितीचे शुल्क रुपये ३८/- भरुन माहिती तात्काळ प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्त्यास तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी कळविले असल्याने विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक ७.५.२०११ चे पत्र अपीलकर्त्यास उशिराने प्राप्त झाल्याचे त्यांनी नमुद केले. परंतु त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. तसेच प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे दाखल केलेले नाही. मात्र अपीलकर्त्याने उमरेड कार्यालयात प्रथम अपील दाखल केले. त्यामुळे आज सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी हजर झाले नाही असे दिसून येते.

... ३

५.  अपीलकर्ता तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.३.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तयार केली होती व अपीलकर्त्यास भ्रमणध्वनीवरुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले होते असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी अपीलकर्ता व्यक्तिशः माहिती घेण्यास त्यांचे कार्यालयाकडे गेले नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आयोगासमोर अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली. अपीलकर्त्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८९१- ८९३ /३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८९३/२०११.**

श्री. राजेंद्र गुणवंतराव वैद्य,
भत्ते ले आऊट, सिव्हील वार्ड,
ता. जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. अविनाश जोशी,
जनमाहिती अधिकारी तथा,
लेखाधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन चंद्रपूर जिल्हा परिषदेतर्फे शिक्षण विभाग प्राथमिक यांच्या जिल्हा स्तरीय बालक्रिडा स्पर्धा दिनांक २७ ते ३० जानेवारी २०११ दरम्यान पार पडल्या. सदर स्पर्धेच्या भोजन व इतर व्यवस्थेच्या कंत्राटदारांच्या निविदेच्या प्रक्रियेबाबत संपूर्ण माहिती व सदर स्पर्धेसाठी सहभागी झालेल्या तालुका निहाय स्पर्धकांची यादी त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांचे

... २

मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १८.४.२०११ रोजी दाखल केले. त्यानंतर त्यांना दिनांक २०.५.२०११ च्या पत्राने काही माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीमध्ये स्पर्धकांची यादी व निविदेची प्रत तसेच झालेला खर्चाची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ५.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला त्यावेळी तत्कालीन जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. होमदेव डेकाटे, अधिक्षक वर्ग - २ हे दिनांक ३०.८.२०११ पर्यंत कार्यरत होते. त्यानंतर विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १.९.२०११ पासून कार्यरत आहेत. तथापी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही याचा कोणताही खुलासा विद्यमान जनमाहिती अधिकारी हे करु शकले नाही. म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यास तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. होमदेव डेकाटे हे जबाबदार दिसून येतात. त्यानंतर तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.५.२०११ च्या पत्राने काही माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसते. तथापी त्या माहितीमध्ये अपीलकर्त्याने मागितलेल्या संपूर्ण माहितीचा समावेश दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याच्या दिनांक ५.२.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना आवश्यक ती माहिती विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे.

४. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे ही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी या पदाचा पदभार घेतल्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली काही माहिती ही श्री. एल. के. राठोड, विस्तार अधिकारी (शिक्षण) यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून दिनांक २.९.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांना कळविले. तथापी श्री. एल. के. राठोड, विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी अद्यापही विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असेही त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

५. अपीलकर्ता तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसाचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून विलंबाबद्यल त्यांचा खुलासा मागणे संयुक्तिक होईल. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी श्री. एल. के. राठोड, विस्तार अधिकारी यांना दिनांक २.९.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविल्यानंतरही त्यांनी विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडे अद्यापही माहिती दिलेली नाही म्हणून त्यांचा देखील याबाबत खुलासा मागणे संयुक्तिक होईल. तथापी विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक ५.२.२०११ च्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक ५.२.२०११ च्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. होमदेव डेकाटे यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक ५.२.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसाचे मुदतीत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यानंतर दिनांक २०.५.२०११ च्या पत्राने विलंबाने काही माहिती दिलेली आहे. तथापी सदरच्या माहितीमध्ये अपीलकर्त्याच्या दिनांक ५.२.२०११ च्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या माहितीचा समावेश दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध होण्यास तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. होमदेव डेकाटे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- शास्तीची कार्यवाही कां करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा.

३) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी श्री. एल. के. राठोड, विस्तार अधिकारी (शिक्षण) यांचेकडे दिनांक २.९.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्याने मागितलेली काही माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. तथापी श्री. एल. के. राठोड यांनी अद्यापपर्यंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडे कोणतीही माहिती दिलेली नाही म्हणून त्यांनी १० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांचे विरुध्द दंडाची कार्यवाही करण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

४) या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे **<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर</u>** यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८९४- ८९७ /३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८९/२०११.**

श्री. नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो. इटखेडा,
ता. अर्जुनी /मोर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. के. क्षिरसागर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया.

श्री. एस. के. यादव,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी त्यांनी अपील अर्जात असे नमुद केले आहे की, त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले आहे.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने दिनांक २३.१.२०११ रोजीचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने जानवा तलाठी सा. क्र. १९, राजस्व निरिक्षक मंडळ, महागांव येथील अपीलकर्ता हे रहिवाशी असून गट नं. १७८ आराजी ४२ आर सागवन खुट झाडे आहेत. शेतातील खूट झाडावर मालकी हक्क असल्याचे मालकीयत प्रमाणपत्र मिळण्याविषयी दिनांक ४.१.२०११ ला दिलेल्या अर्जानुसार झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याचा दिनांक २३.१.२०११ रोजीचा माहितीचा अर्ज श्री. एस. डी. प्रधान, प्रस्तुतकार-१ यांनी जनमाहिती अधिकारी त्यांचेकडे सादर केलेला नाही म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती देता आली नाही. तथापी अपीलकर्त्याने यापुर्वी देखील दिनांक १६.८.२०१० चा अर्जाने माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु श्री. एस. डी. प्रधान, प्रस्तुतकार-१ यांनी अपीलकर्त्याचा दिनांक २३.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे सादर न केल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक २३.१.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन उत्तर पाठविता आले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार यांचेकडे दिनांक ४.४.२०११ रोजी दाखल केले होते. तथापी तत्कालीन तहसीलदार यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही असे विद्यमान तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.१.२०११ चा माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने यापुर्वी उपलब्ध करुन दिलेली माहिती पुन्हा विनामुल्य पाठविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक २३.१.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक १८.१०.२०१० च्या पत्राने यापुर्वी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची प्रत पुन्हा पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्यांचा दिनांक २३.१.२०११ चा माहितीचा अर्ज श्री. एस. डी. प्रधान, प्रस्तुतकार-१ यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीसाठी सादर केलेला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झालेला दिसून येतो. या विलंबास प्रस्तुतकार-१, श्री. एस. डी. प्रधान हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्तीची कार्यवाही त्यांचेवर कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांत आयोगासमोर सादर करावा.

३) तत्कालीन तहसीलदार तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून तत्कालीन तहसीलदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात या अशा बाबींची पुनर्रावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येते.

४) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत तत्कालीन तहसीलदार आणि श्री. एस. डी. प्रधान, प्रस्तुतकार-१ यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८९८- ९०० /३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८९४/२०११.**

श्री. शिवकांत एच. जैस्वाल,
१४७, अंबाझरी ले आऊट,
अमरधन लक्ष्मी अपार्टमेंट,
हिल टॉप, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर), नागपूर.

श्री. एस. डब्ल्यू. पुरोहित,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर शहर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांच्या वाहनाच्या हायरपर्चेस ॲग्रीमेंट रद्य करण्याचे संदर्भात तसेच सदरचे काम जो लिपिक हाताळत आहे त्याचे संदर्भाम तसेच शासन निर्णय व एजंट इत्यादीबाबत एकूण ११ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक १८.४.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १४.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १६.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास माहिती अर्जातील माहिती दिनांक १९.४.२०११ च्या पत्राने कागदपत्राचे स्वरुपात जी होती ती पोस्टाद्वारे पाठविली. त्यामध्ये परिवहन आयुक्तांकडून निर्गमित केलेली परिपत्रकाची प्रत सुध्दा पाठविण्यात आली. सदरची माहिती त्यांनी साध्या पोस्टाने अपीलकर्त्यास जावक क्रमांक ४४२५, दिनांक १९.४.२०११ रोजी पोस्टाने पाठविल्याचे आयोगासमोर दाखविले. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाने प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १९.४.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली व आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक १९.४.२०११ ने पाठविलेली माहिती ही फक्त ५ मुद्यांबाबतची आहे. बाकी मुद्या क्रमांक ६ ते ११ ची माहिती त्यांना देण्यात आली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कागदपत्राचे स्वरुपात जी माहिती त्यांचेकडे उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ६ ते ११ बाबत कागदपत्राचे स्वरुपात माहिती उपलब्ध नसल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ६ ते ११ मुद्यांची कागदपत्राचे स्वरुपातील माहिती किंवा माहिती उपलब्ध नसल्यास त्याची वस्तुस्थिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९०१- ९०२ /६.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३३/२०११.

श्री. राजू किसन वानखेडे,
श्रीराम वार्ड, ता. बल्लारपूर,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. टी. ताकसांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
गुरुनानक विज्ञान महाविद्यालय,
ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
प्राचार्य,
गुरुनानक विज्ञान महाविद्यालय,
ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यानी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, गुरुनानक विज्ञान महाविद्यालय, बल्लारपूर यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. पी. के. मुलमुले, कार्यकारी प्राचार्य यांच्या सेवा पुस्तकाची झेरॉक्स प्रत तसेच त्यांच्या नियुक्ती आदेशाची झेरॉक्स प्रत व

... २

त्यांना विद्यापीठाने मान्यता दिल्याबाबतची झेरॉक्स प्रत अशी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १२.२.२०११ च्या पत्राने रुपये ७५/- माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्याला अनुसरुन त्यांनी माहितीचे शुल्क दिनांक २२.२.२०११ रोजी भरले व त्यांना दिनांक ३.३.२०११ रोजी माहिती मिळाली. परंतु सदरच्या माहितीवर कव्हरिंग लेटर त्यांना देण्यात आले नाही. म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांनी माहितीचे शुल्क भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.३.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी अपीलकर्त्यास त्या माहिती सोबत कव्हरिंग लेटर देण्यात आलेले नाही. म्हणून सदरची माहिती माहिती अधिकार अर्जान्वये देण्यात येत आहे असे कव्हरिंग लेटर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.३.२०११ रोजी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही माहिती अधिकाराखालील अर्जानुसार उपलब्ध करुन दिलेली आहे असे कव्हरिंग लेटर लिहून कळवावे.

२) तसेच प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी हे प्राचार्य असल्याचे दिसून येते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिक्षक असल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता प्रथम अपीलीय अधिकारी हे प्राचार्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे असणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून अधिक्षक यांची नेमणूक करुन प्राचार्य यांची प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून नेमणूक करणे योग्य आहे. म्हणून याबाबत प्राचार्यांनी त्वरित कार्यवाही करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९०३- ९०४ /६.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७७५/२०११.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड,
जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. टी. धुळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नियोजन)
मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), अमरावती - ४४४ ६०२.

जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती - ४४४ ६०२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. कडू, लेखापाल हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. ए. ए. गंगासागर, मुख्य लिपिक व श्री. डी. डी. पिदडी, मुख्य लिपिक यांच्या सेवाशर्तीबाबत एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.३.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपण

... २

मागितलेली माहिती ही फार जुनी असल्यामुळे अ, ब, क, ड नुसार माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय वन अधिकारी (नियोजन), अमरावती यांचेकडे दिनांक २८.२.२०११ रोजी दाखल केले प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणीनंतर दिनांक २२.३.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला व त्या निर्णयात अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती देण्याचे आदेश दिले. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु संपूर्ण माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीनी सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २५.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आस्थापना शाखेशी संबंधित असल्याने आस्थापना शाखेकडून त्यांनी माहिती मागितली. आस्थापना शाखेनी जनमाहिती अधिकारी यांना असे कळविले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अ, ब, क, ड नुसार देता येत नाही. त्याप्रमाणे त्यांनी अपीलकर्त्यास कळविले. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय वन अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २२.३.२०११ रोजी देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, आस्थापना विभागाने अ, ब, क, ड प्रमाणे कार्यवाही केली असल्यास ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाचे या निर्णयाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २९.८.२०११ च्या पत्राने १ ते १० मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. सदरच्या माहितीमध्ये जी माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध होती ती अपीलकर्त्यास देण्यात आली व जी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही त्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांना दिनांक २९.८.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती त्यांना दिनांक ५.९.२०११ रोजी प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे मान्य केले. परंतु माहिती अपूर्ण मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तथापी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जी माहिती उपलब्ध होती ती माहिती

... ३

अपीलकर्त्यास दिल्याचे दिसून येते व जी माहिती उपलब्ध नाही त्याची वस्तुस्थिती देखील अपीलकर्त्यास कळविलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९०५- ९०७ /६.९.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८१/२०११.

श्री. आसिफ अख्तर हलीमी,
खतिजाबाई मुलींच्या शाळेजवळ,
शेख बुनकर कॉलनी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रविंद्र पांढरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी, जि. नागपूर.

श्री. पी. आर. खाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना लिपिक,
नगर परिषद, कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना लिपिक, नगर परिषद, कामठी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नगर परिषदमधील कर्मचाऱ्यांची जेष्ठता सुची व मंजूर पदे व रिक्त पदे याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्याना प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती ही संवर्ग निहाय नाही तसेच त्यांना रोजंदारीवर असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

... २

३.    जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आस्थापना शाखेशी संबंधित असल्यामुळे आस्थापना शाखेकडून सदरची माहिती संकलीत करण्यास सुरुवात केली. तसेच अपीलकर्त्याने नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती मागितल्यामुळे सदरची माहिती तयार करण्यास बराच कालावधी लागला. त्यानंतर माहिती संकलीत झाल्यावर अपीलकर्त्यास दिनांक २९.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगासमोर मान्य केले. मात्र सदरची माहिती संवर्ग निहाय नाही व रोजंदारीवर असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, नगरपरिषद कार्यालयाकडे ज्या नमुन्यात कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी आहे ती यादी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ च्या संदर्भात मंजूर पदांची व रिक्त पदांची माहिती सुध्दा दिलेली आहे. मात्र अपीलकर्त्याने रोजंदारी कर्मचाऱ्यांची यादी मागितलेली नाही म्हणून रोजंदारी कर्मचाऱ्यांची यादी त्यांना देण्यात आली नाही. तथापी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध व रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांची यादी देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाची प्रत व रोजंदारीवरील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रत विनामुल्य किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७७८/२०११.

श्री. सतिश तुकाराम चारथळ,
द्वारा - रामभाऊ कृ. राऊत, हनुमाननगर,
नागपुरे आटा चक्कीजवळ, तुकुम, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मा. जिल्हा न्यायाधिश - १,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.

श्री. सु. व. मसादे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक २१.११.२०१० रोजी झालेल्या विभागीय चाचणी परिक्षेचे बैठक क्रमांक १ ते १७ पर्यंतचे इंग्रजी व मराठी टंकलेखन यांचे पेपरची प्रमाणित प्रत तसेच इंग्रजी व मराठी टंकलेखन परिक्षेच्या तपासणीची व गुण देण्याची पध्दतीबाबत व दिनांक ३०.११.२०१० रोजी झालेलया लेखी परिक्षेचे बैठक क्रमांक १ ते १७ पर्यंतच्या लेखी परिक्षेची प्रमाणित प्रत अशी त्यांनी ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कडून दिनांक ४.१.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती संबंधितांकडून मागविली असता वर्ग-ड चे

... २

कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक म्हणून वर्ग-क मध्ये पदोन्नतीची भरती प्रक्रिया गोपनीय असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(ड) आणि महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय माहिती अधिकार (सुधारित) नियम २००९ मधील नियम १३(ई) नुसार सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र दिनांक २५.२.२०११ च्या आदेशाने त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यांचा दिनांक २१.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जिल्हा न्यायालयासाठी माहिती अधिकाराची अंमलबजावणी संदर्भात स्वतंत्र नियम सन २००९ मध्ये तयार केले. त्या नियमातील तरतुदीनुसार नियम १३ (ई) प्रमाणे कोणत्याही परीक्षेच्या संदर्भातील माहिती ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे ती जाहिर करण्यास अपवाद केलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पुरविण्याबाबत त्यांनी या नियमातील तरतुदीनुसार सक्षम अधिकारी तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचेकडे दिनांक २२.१२.२०१० रोजी पत्र पाठवून सदरची माहिती देता येईल किंवा कसे याबाबतचे मार्गदर्शन मागितले. त्याला अनुसरुन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिनांक ३.१.२०११ च्या पत्राने असे कळविले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(ड) अन्वये व महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय माहिती अधिकार (सुधारित) नियम, २००९ मधील नियम १३(इ) अन्वये सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास अपवाद ठरविलेली आहे. म्हणून सदरची माहिती देता येत नाही असे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना कळविले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.१.२०११ च्या पत्राने सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा व सत्र न्यायाधिश-१, चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.२.२०११ रोजी देण्यात आला व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकाऱ्यांकडील रेकार्ड तपासले असता अपीलकर्त्याने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(ड) नुसार माहिती प्रकट करण्यास

अपवाद केलेला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय माहिती अधिकार (सुधारित) नियम, २००९ मधील नियम १३(ई) नुसार परिक्षा प्रक्रियामध्ये गोपनीयता पाळणे जरुरीचे असल्याचे माहिती देता येऊ शकत नाही असे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, चंद्रपूर हे सक्षम अधिकारी असल्याने त्यांनी कळविले आहे. त्यानुसार जिल्हा न्यायालयाने पदोन्नतीसाठी घेतलेल्या परिक्षेच्या गोपनीयतेला बाधा येणारी माहिती ही माहिती देण्यापासून सुट देण्यात आली आहे. त्यामुळे माहिती अधिकाऱ्यांचा माहिती न देण्याचा निर्णय योग्य आहे असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात दिलेला असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणी संबंधात महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय माहिती अधिकार (सुधारित) नियम, २००९ हे स्वतंत्र तयार केले आहे. त्या नियमातील नियम १३(ई) नुसार परिक्षा प्रक्रियेमध्ये गोपनीयता पाळणे जरुरीचे असल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८३/२०११.

श्री. शेख सलीम शेख अकबर,
इस्माईलपुरा, ता. कामठी, जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.

श्री. कुकडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
विज्ञान सल्लागार, शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विज्ञान सल्लागार, शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचेकडे नागपूर विभागातील सर्व महानगरपालिकेच्या सर्व माध्यमातील शिक्षकांच्या बदली बाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे सांगितले व त्याप्रमाणे रोजनाम्यावर सहमतीसाठी स्वाक्षरी केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९१३ /७.९.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९३/२०११.

श्री. विकास गणपतराव शेंडे,
नागरी बँक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,
हिंदनगर, ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

श्रीमती ज्योत्स्ना मु. माडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ३१.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दिनांक ६.१२.२०१० ला नागपूर अधिवेशनात मा. प्रधान सचिव यांना दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात व इतर मुद्यांचे संदर्भात एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती पाठविण्यात आली. तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव यांचेकडे ८.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

... २

३.      जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक ३१.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे दिनांक २१.२.२०११ ला प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती संकलीत करण्यात आली व त्यांचेशी संबंधित असलेल्या मुद्या क्रमांक ३ ची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. मुद्या क्रमांक १ व २ च्या संदर्भात अपीलकर्त्यास असे कळविण्यात आले की, त्यांच्या दिनांक ६.१२.२०१० च्या निवेदनाची प्रत त्यांचे कार्यालयास प्राप्त झाली नाही म्हणून त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे अपीलकर्त्यास कळविले. तसेच अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती ही म्हाडाशी संबंधित असल्यामुळे अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाची प्रत जनमाहिती अधिकारी गृहनिर्माण मंत्रालय यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक ६ व ७ ची माहिती ही नोंदणी महानिरिक्षक, मुद्रांक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी संबंधित असल्यामुळे अपीलकर्त्याचा माहिती अर्जाची प्रत देखील त्यांचेकडे पाठविण्यात आली व त्यांना अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविण्यात आले अशा प्रकारची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४.      त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे सुनावणीसाठी अपीलकर्त्यास बोलविण्यात आले तथापी अपीलकर्ता त्या सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे आणि त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांची बदली झाली त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित झाला नाही.

५.      अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ३१.१.२०११ चा माहितीच्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक ३०.३.२०११ च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविली आहे व अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ४, ५, ६ व ७ ची माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे त्यांचेकडे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांचे अर्जाचे हस्तांतरण केलेले आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जाचे हस्तांतरण ज्या कार्यालयाकडे केलेले आहे त्या कार्यालयास जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५, ६ व ७ या मुद्द्यांची माहिती संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्याबाबत कळवावे व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९२/२०११.

श्री. सुभाष हरिश्चंद्रजी कापगते,
मु. रेंगेपार/कोहळी, ता. लाखनी, जि. भंडारा - ४४१ ८०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. व्ही. एच. मस्के,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद विद्यालय, पालोरा,
ता. मोहाडी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. एम. के. तेलतुंबळे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यांचा दिनांक २४.१.२०११ रोजीचा माहितीचा अर्ज त्याचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक, जिल्हा परिषद विद्यालय, पालोरा, ता. मोहाडी यांचेशी संबंधित असल्याने सदरच्या माहितीचा अर्ज मुख्यापकाकडे त्यांनी पाठविला. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने श्री. हरिष सदाशिव समरित, सहाय्यक शिक्षक, जिल्हा परिषद विद्यालय, पालोरा हे स्नेहा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, पिंपळगाव/सडक, ता.

... २

लाखनी तसेच स्नेहा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, लाखोरी (अनोंदणीकृत) या खाजगी शिक्षण संस्थेचे सदस्य आहेत. ते शासकीय नोकरीत आहेत तेंव्हा त्यांनी शिक्षण विभागाची परवानगी घेतली आहे काय. परवानगी पत्राची सत्यप्रत त्यांनी मागितलेली होती. तसेच परवानगी घेतली नसल्यास त्यांचेवर काय कायदेशीर कार्यवाही केली या संबंधाने माहिती मागितलेली होती. म्हणून मुख्याध्यापकांनी श्री. हरिष सदाशिव समरित यांना दिनांक २६.२.२०११ रोजी पत्र पाठवून त्यांचेकडून माहिती मागितली. त्यानंतर श्री. हरिष सदाशिव समरित यांनी मुख्याध्यापक यांचेकडे दिनांक ४.३.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये श्री. समरित यांनी मुख्याध्यापक यांना असे कळविले की, विद्यमान परिस्थिती ते स्नेहा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, लाखोरी (अनोंदणीकृत) या शिक्षण संस्थेचे सदस्य नाही व सदरची माहिती मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास दिनांक ११.३.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने पाठविल्याबाबतचा पुरावा आयोगासमोर दाखविला.

४. अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचेकडे दिनांक २१.३.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ७.४.२०११ रोजी ठेवण्यात आली. तथापी अपीलकर्ता सुनावणीस गैरहजर राहिले. मात्र मुख्याध्यापकांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली. मात्र अपीलकर्ता हे अनुपस्थित राहिले म्हणून प्रथम अपील खारीज केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास मुख्याध्यापिका यांनी दिनांक ११.३.२०११ च्या पत्राने रजिस्टर पोस्टाद्वारे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९१७- ९१८ /८.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९१/२०११.**

श्री. किष्णो कुटीश्वर मंडल,
रा. जायनगर, पो. सोनापूर,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चामोर्शी, जि. गडचिरोली.

श्री. ए. व्ही. उंदिरवाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
ग्राम पंचायत, विक्रापूर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, विक्रापूर, ता. चामोर्शी यांचेकडे जलस्वराज प्रकल्पांतर्गत केलेल्या बांधकामाची माहिती मागितलेली होती. सदर प्रकरणी अपीलकर्ता यांनी सादर केलेल्या दिनांक २९.१०.२०१० च्या माहिती अर्जावर यापुर्वी आयोगाकडे अपील क्रमांक ३८५/२०११ दिनांक १८.६.२०११ रोजी सुनावणी झाली असून आदेश पारित करण्यात आले आहे. त्यामुळे एकाच अर्जावर दुसऱ्यांदा आदेश पारित करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०१/२०११.

श्री. प्रभाकर जयरामजी क्षिरसागर,
रा. नरखेड पेठ, वार्ड क्र. ५, ता. नरखेड, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. जी. जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नरखेड, जि. नागपूर.

श्री. पी. आर. साधनकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
संजय गांधी निराधार योजना,
ता. नरखेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, नरखेड यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन तहसीलदार नरखेड यांनी त्यांचेकडील रा.मा.क्र.-१/बीएनडी-५४/२००७-२००८ मौजा नरखेड यांचे दिनांक २७.६.२००९ रोजी पारित केलेल्या रस्त्याच्या आदेशामुळे व्यथित होऊन अर्जदारानी उपविभागीय अधिकारी, काटोल यांचेकडे अपील केली. अपीलाचा निकाल व आदेश दिनांक ३०.१०.२०१० रोजी लागून निकालाची व आदेशाची प्रत आपणास मिळूनही दिनांक

... २

३०.१२.२०१० पर्यंत दखल घेऊन कोणतीच कार्यवाही केली नाही. हा अर्जदारावर अन्याय आहे. म्हणून अपीलकर्त्यास वहीवाटीचा व बैलबंडीचा रस्ता त्यांच्या शेतापर्यंत खुला करुन मिळावा अशी मागणी त्यांनी केली होती. तथापी त्यांना अद्यापही शेतात जाण्यासाठी वहीवाटीचा व बैलबंडीचा रस्ता खुला करुन मिळाला नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसीलदार, नरखेड यांचेकडे दिनांक ३१.३.२०११ रोजी दाखल केले. तथापी अद्यापही त्यांना रस्ता खुला करुन मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने कागदपत्राचे स्वरुपात कोणतीही माहिती मागितलेली नव्हती. अपीलकर्त्याने या अर्जात असे नमुद केले की, उपविभागीय अधिकारी, काटोल यांचेकडील दिनांक ३०.१०.२०१० चा अपीलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना त्यांचे शेतापर्यंत जाण्याचा वहीवाटीचा व बैलबंडीचा रस्ता खुला करुन मिळावा अशी मागणी त्यांनी केली होती. मात्र कोणत्याही कागदपत्राची मागणी केली नव्हती म्हणून कागदपत्रे देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

४. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसीलदार यांचेकडे दाखल केले. तहसीलदार यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २७.४.२०११ रोजी घेतली. त्या सुनावणीचे वेळी अपीलकर्ता हे हजर होते. त्यावेळी अपीलकर्त्याने अशी मागणी केली की, त्यांना मौजा नरखेड येथील शेत सर्व्हे नं. ८६९ या शेताच्या वहीवाटीचा रस्ता खुला करुन मिळावा. तथापी त्यांना रस्ता मिळणेबाबत तहसील कार्यालयात सुरु असलेले प्रकरणातून कोणत्याही कागदपत्रांची मागणी केलेली नाही. म्हणून याबाबत अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष समजावून सांगण्यात आले व रस्ता खुला करण्याचे संदर्भात नियमाप्रमाणे आदेश पारित करण्यात येईल याची जाणीव अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे सुनावणीत करुन दिली. ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास समजावून सांगितल्यानंतर सदर प्रकरणात प्राधान्याने निर्णय लावावा अशी विनंती त्यांनी केली. त्यानंतर अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात आले.

... ३

५. प्रस्तुत प्रकरणी तहसीलदार यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याच्या रस्ता मागणीच्या संदर्भात त्यांना दिनांक १२.८.२०११ रोजी नियमानुसार आदेश पारित केलेला असून त्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आता ही वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे रस्ता मागणीचे प्रकरणी संबंधित तहसीलदार यांनी दिनांक १२.८.२०११ रोजी पारित केलेल्या आदेशाची वस्तुस्थिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९२१- ९२३ /९.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९४/२०११.**

श्री. गोपीनाथ कवडुजी भगत,
५३, जयभिम को-ऑप.हाऊसिंग सोसायटी,
चंद्रमणीनगर, पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना,
विदर्भ विभाग, इमामवाडा, नागपूर.

श्री. डॉ. श्रीखंडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना,
विदर्भ विभाग, इमामवाडा, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, इमामवाडा, नागपूर यांचेकडे सेवा योजना कार्यालयाकडून रजा कालावधीकरिता २९/२९ दिवसाचेच तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या असलेल्या आदेश मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती. सदरच्या

... २

अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त यांना लेखी निवेदन सादर करुन दिनांक २५.७.२०११ ला मुंबई येथे सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीमध्ये समाधान कारक उत्तर मिळाले आहे. म्हणून सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९००/२०११.

श्री. रामलाल भगवंतसिंह चौहाण,
जुना बाबुलखेडा, जुनी वस्ती, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. भा. र. गावीत,
जनमाहिती अधिकारी तथा,
अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्यासन -२९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १४ एप्रिलची सार्वजनिक सुट्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त नागपूर जिल्हयास कोणत्या वर्षा

... २

पासून सुरु करण्यात आली त्या वर्षाची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्याना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.३.२०११ च्या पत्राने असे कळविले की, प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावरुन शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून मागणी केलेली माहिती देता येत नाही असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक २५.४.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ३० वर्षापुर्वीची जुनी असल्यामुळे संबंधित कागदपत्राचे स्वरुप विचारात घेऊन ती यापुर्वीच नष्ट केली गेली असल्याची शक्यता असल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे नमुद करुन प्रथम अपील खारीज केलेले आहे. त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ११.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा कसून शोध त्यांचे कार्यासनात घेण्यात आला. तथापी सदरची माहिती त्यांना कार्यालयात उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ३१.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध होऊ शकत नाही असे कळविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. मात्र अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ३० वर्षापुर्वीची जुनी असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील खारीज केल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे ही निदर्शनास आणून दिले की, शासन स्तरावरुन दर वर्षी सार्वजनिक सुट्ट्या जाहिर होत असतात आणि या सुट्ट्यांची अधिसुचना प्रसिध्दी शासकीय मुद्रणालय, मुंबई येथे होत असते म्हणून १४ एप्रिलची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य सुट्टी कोणत्या वर्षापासून जाहिर करण्यात आली आहे याबाबतची जाहीर अधिसुचना शासकीय मुद्रणालय, मुंबई यांचेकडे उपलब्ध असल्यास त्यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास देण्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येते.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी १४ एप्रिलची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य सार्वजनिक सुट्टी कोणत्या वर्षी पासून जाहिर करण्यात येत आहे याबाबतच्या अधिसुचनेची प्रत शासकीय मुद्रणालय, मुंबई यांचेकडे पत्र व्यवहार करुन प्राप्त करावी व सदरची माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी त्यांचेकडूनही माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०९/२०११.**

श्री. सुधीर बबनरावजी बेले,
मु. पो. वेलतूर, ता. कुही, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
गोसीखुर्द प्रकल्प मंडळ,
ता. जि. नागपूर.

श्री. र. प. वऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
गोसीखुर्द पुनर्वसन विभाग,
प्लॉट नं. १३, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. श. या. सोनकुसरे, सहाय्यक अधिक्षक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इंदिरा सागर (गोसेखुर्द) पुनर्वसन विभाग, नागपूर यांचेकडे कुही तालुक्यातील बाधीत गावठान मौजा गोन्हा, चिखली गावाचे पर्याची स्थळी पुनर्वसन होत असून पर्यायी गावठानात शासनाचे १३ नागरी सुविधा बाबतची माहिती

... २

मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त यांना लेखी निवेदन सादर करुन मला आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली आहे. करिता अपील मागे घेऊन प्रकरण समाधानकारक निकाली काढल्याची संमती मी देत आहे. माहिती पुर्णपणे व व्यवस्थित देण्यात आलेली आहे व याउपरांत आता मला अपीलासंदर्भात सुनावणीची आवश्यकता नाही असे निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८१४/२०११, अपील क्रमांक ८१५/२०११ व अपील क्रमांक ८१६/२०११.**

श्री. सावजी चैतुजी पदा,
मु. खेडेगांव, पो. गेवर्धा,
ता. कुरखेडा, जि. गडचिरोली.

श्री. संतोष मारोती गोंधोळे,
वार्ड नं. ५, हनूमाननगर, सिताबर्डी,
ता. आरमोरी, जि. गडचिरोली.

श्री. माधव महागुजी मडावी,
मु. पो. जोगीसाखरा, ता. आरमोरी,
जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
न्यास नोंदणी कार्यालय,
ता. जि. गडचिरोली.

श्री. हरीराम वरखडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष, राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्था,
जोगीसाखरा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ते यांनी दिनांक २३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेली तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. तिन्ही अपीलामधील मागितलेली माहिती ही एकाच संस्थेच्या संबंधात आहे. तसेच तिन्ही अपीलामध्ये जनमाहिती

... २

अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे तिन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. अनीलकुमार आर. उके व ॲड. एस. बी. अहीर, वकील हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. वा. अ. दहिवाडे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. तिन्ही अपीलकर्ता यांचे वकीलांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष, राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्था, जोगीसाखरा, ता. आरमोरी या संस्थेच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली दिनांक १७.१.२०११ व दिनांक २.२.२०११ रोजी स्वतंत्रपणे ३ अर्ज सादर करुन माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक धर्मदाय आयुक्त, गडचिरोली यांचेकडे दिनांक २.२.२०११ रोजी व दिनांक १९.३.२०११ रोजी दाखल केले. तिन्ही प्रकरणात प्रथम अपीलाची सुनावणी होऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापी त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे ३ द्वितीय अपीले दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष, राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्था, जोगीसाखरा यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यांनी केलेले तिन्ही अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाले नाही म्हणून अपीलकर्त्यांना ३० दिवसांचे नंतरही माहिती देता आली नाही. मात्र तिन्ही अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती ही राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्थेशी संबंधित असल्याने अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, तिन्ही प्रकरणामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांना अद्यापपर्यंत मिळाली नाही. म्हणून प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी आयोगासमोर माहिती देण्याचे त्यांनी मान्य केल्याने तिन्ही अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्त्यांचे अपील क्रमांक ८१४/२०११, अपील क्रमांक ८१५/२०११ व अपील क्रमांक ८१६/२०११ ही तिन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष, राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्था, जोगीसाखरा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली यांनी तिन्ही अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९०३/२०११.**

श्री. खेमचंद घिगुजी मेश्राम,
द्वारा - बंसी रामटेके, संत गाडगेबाबा नगर,
गोवर्धन बिल्डींग जवळ, नगीना बाक,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. ई. भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
अध्यक्ष,
छत्रपती राजर्षी शाहु महाराज नागरी सहकारी पत संस्था,
जटपूरा गेटजवळ, ता. जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. प्रविण कवरासे, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष, छत्रपती राजर्षी शाहू महाराज नागरी सहकारी पत संस्था, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर

... २

करुन त्यांचे थकीत कर्जाबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. चंद्रपूर यांचेकडे दिनांक ११.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने उपस्थित असलेले ॲड. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरच्या नागरी पतसंस्थेला शासनाचे कोणतेही वित्त सहाय्य कर्ज स्वरुपात किंवा अनुदान स्वरुपात प्राप्त झालेले नाही. म्हणून मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया संस्थेस लागू होत नाही. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले वकीलांनी आयोगापुढे सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी देखील आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास संस्थेने त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र संस्थेकडून त्यांना जो खाते उतारा देण्यात आलेला आहे त्या खाते उतारा रजिस्टरमध्ये त्यांनी भरलेल्या कर्जापोटीची रक्कम पुर्णपणे दर्शविण्यात आलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर वकीलांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या कर्जाचे पोटी भरलेल्या रकमेचा तपशील त्याबाबतचे त्यांचे विवरणपत्र संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यात दाखविलेल्या रक्कमा हया नियमानुसार असून त्यांच्या नोंदी घेतलेल्या आहेत व घेतलेल्या नोंदीचे विवरण अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेले आहे. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे असे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी देखील आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे वकील व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सदरच्या संस्थेस शासनाचे कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य

किंवा अनुदान प्राप्त झालेले नाही म्हणून सदरच्या संस्थेस माहिती अधिकार हा लागू होत नाही. तथापी वर नमुद केल्याप्रमाणे संस्थेने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९०२/२०११.

कु. विद्या भैय्यालाल गोस्वामी,
विनोबा नगर, बावनथडी कॉलनी मागे,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१.

जनमाहिती अधिकारी तथा,
उपआयुक्त,
महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती व उत्तरवादी हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी अपीलकर्तीने द्वितीय अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपीलकर्तीने जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडे दिनांक १०.३.२०११ रोजी माहितीचा अर्ज सादर करुन जिल्हा परिषद हायस्कूल, राजूरा येथील डी.टी.एड्. परीक्षा सप्टेंबर २००९ व सप्टेंबर २०१० च्या

... २

परीक्षेच्या केंद्र क्रमांक ७५६४ च्या द्वितीय वर्ष निकालाची प्रत प्रपत्रात मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दिनांक २५.३.२०११ च्या पत्राने असे कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) नुसार आपण तयार केलेल्या प्रपत्रात माहिती देणे अपेक्षित नाही. तथापी सदर निकालाच्या झेरॉक्स प्रती संबंधित अध्यापक विद्यालय यांच्याकडे पत्रव्यवहार करुन प्राप्त करुन घेता येतील असे अपीलकर्तीस कळविलेले दिसते. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडे दिनांक १३.४.२०११ रोजी दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांनी अपीलकर्तीस दिनांक १०.५.२०११ च्या पत्राने निकालाच्या प्रती संदर्भात माहितीचे शुल्क रुपये १४५/- भरण्याब ाबत कळविले. तथापी अपीलकर्तीने माहितीचे शुल्क भरणा केलेले दिसत नाही. म्हणून अपीलकर्तीने माहितीचे शुल्क भरणाकरुन जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्तीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडील दिनांक १०.५.२०११ च्या पत्राने कळविल्यानुसार माहितीचे शुल्क रुपये १४५/- मनीऑर्डरद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२) अपीलकर्तीचे माहितीचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९३७- ९३८ /१३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९०५/२०११.**

श्री. गणपती लक्ष्मणराव बघाळे,
वार्ड नं. ३, मु. पो. ता. नरखेड, जि. नागपूर - ४४१ ३०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. व्ही. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

श्रीमती कविता वि. बुटले,
जनमाहिती अधिकारी तथा,
निरिक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा निरिक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचेकडे कनिष्ठ तथा भांडार लिपिक या पदाची कार्यप्रणाली व इतर ६ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२०११ रोजी

... २

उपसचिव, राज्य माहिती आयोग यांचेकडे माहिती मला मिळालेली असून व मी सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिखण यांची भेट घेतली असता मला समाधानकारक उत्तर मिळाल्यामुळे द्वितीय अपील मागे घेत आहे असे लेखी निवदेन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२०/२०११.**

श्री. बि. व्ही. बेताल,
माहिती व मार्गदर्शन कार्यालय,
काजीवार्ड, बस स्टँड समोर,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. डी. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (सं. वसु, विभाग),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. सुनिल वसंतराव फडणवीस,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक अभियंता,
ग्रामीण उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ग्रामीण उपविभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, ता. समुद्रपूर, जि.

... २

वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामीण उपविभाग, समुद्रपूर अंतर्गत डी.सी.वाईज कृषी पंप विज जोडणी मार्च २००९ ते ३१ मार्च २०१० पर्यंतची यादी. सन २००६ ते २०१० पर्यंतची डी.सी.वाईज शुन्य पोल कृषीपंप जोडणीची यादी इत्यादी बाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती व सदरची माहिती ते व्यक्तिशः घेणार असे त्यांनी नमुद केले होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात वारंवार जाऊनही जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दिनांक २.४.२०११ रोजी दाखल केले. त्यानंतर त्यांना दिनांक ७.४.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अस्पष्ट असल्याने वाचता येत नाही. त्याचप्रमाणे त्यांना शुन्यपोल कृषी पंपाबाबत २००६ ते २०१० या कालावधीची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले व जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अंतर्गत शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात अपीलकर्त्याने कृषी पंप जोडणीबाबत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने यु.पी.सी पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविल्याचे त्यांनी सांगितले. मात्र त्याबाबतचा मुळ जावक रजिस्टरचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला नाही. तसेच दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास पोस्टाने उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. त्यानंतर प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करण्यात आला व त्या प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे संगणकावर उपलब्ध असलेली माहिती दिलेली असल्यामुळे प्रथम अपील खारीज करण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी अपीलकर्त्यास दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती उपलब्ध झाली नसल्याने पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.४.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने पोस्टाने पाठविलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक ७.४.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी सदरच्या माहितीचे अवलोकन आयोगासमोर करण्यात आले असता असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती हया अवाचनीय आहेत. त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात कोणताही स्पष्ट बोध होत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा माहितीचे वाचनीय प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने ज्या कालावधीची माहिती मागितलेली आहे त्या कालावधीची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे देखील आवश्यक आहे. मात्र ज्या कालावधीची माहिती उपलब्ध नसेल तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन संपूर्ण माहितीची वाचनीय प्रत अपीलकर्त्यास पुन्हा विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९४१- ९४३ /१४.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२४/२०११.**

श्री. सदानंद श्रावणजी गणवीर,
अंबिकानगर, ता. जि. यवतमाळ - ४४५ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
ता. जि. यवतमाळ.

श्री. व्ही. जी. नाल्हे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक - १,
ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी नागपूर खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. व्ही. ए. शिरभाते, उपकार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी जनमाहिती

... २

अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक - १, यवतमाळ यांचेकडे वसंत स्मृती उद्यान, उमरसरा येथील बांधकामसंबंधी अभियंत्या समवेत प्रत्यक्ष पाहणी व पाहणी अहवाल मागितलेला होता. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२०११ रोजी लेखी निवेदन सादर करुन कार्यकारी अभियंता यांचे दालनात महितीबाबत सविस्तर चर्चा केली असून त्यामध्ये माझे पुर्ण समाधान झाले आहे व आता सदर प्रकरणाबाबत माझी काहीही तक्रार राहिलेली नाही असे निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९४४- ९४५ /१४.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२८/२०११.**

श्री. सदानंद श्रावणजी गणवीर,
अंबिकानगर, ता. जि. यवतमाळ - ४४५ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ.

श्री. डी. जी. मराठे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक वनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी नागपूर खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, यवतमाळ यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन माहे मार्च २००९ यवतमाळ वनविभागांतर्गत असलेल्या सर्व वनपरिक्षेत्राची (वखार अधिकारी, जोडमोहा वगळून व वनपरिक्षेत्र अधिकारी, रोजगार हमी योजना वगळून) सादर केलेल्या रोखलेख्याची छायांकित प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना वनपरिक्षेत्र अधिकारी, जोडमोहा व हिवरी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र वनपरिक्षेत्र अधिकारी, यवतमाळ,

... २

घाटंजी, आर्णी, नेर व दारव्हा यांचेकडून अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील उपवनसंरक्षक, यवतमाळ यांचेकडे दिनांक ८.२.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय देखील दिला नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द माहिती अधिकाराखाली कार्यवाही करावी अशी आग्रही प्रतिपादन त्यांनी आयोगासमोर केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, यवतमाळ यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक २२.१२.२००९ चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहे मार्च २००९ यवतमाळ वनविभागांतर्गत असलेल्या सर्व वनपरिक्षेत्राची (वखार अधिकारी, जोडमोहा वगळून व वनपरिक्षेत्र अधिकारी, रोजगार हमी योजना वगळून) सादर केलेल्या रोखलेख्याची छायांकित प्रत संपूर्ण विस्तृत माहितीसह मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यवतमाळ, जोडमोहा, घाटंजी, हिवरी, आर्णी, नेर व दारव्हा यांचेशी संबंधित असल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२००९ च्या पत्राने सदरच्या माहितीचा अर्ज त्यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), जोडमोहा व हिवरी याचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र वनपरिक्षेत्र अधिकारी, यवतमाळ, घाटंजी, आर्णी, नेर व दारव्हा यांचेकडून अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झालेली दिसत नाही. तसेच त्यांचे कार्यालयाकडे देखील त्यांनी माहिती पाठविलेली नाही म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपवनसंरक्षक, यवतमाळ यांचेकडे दाखल केले. मात्र सदरच्या प्रथम अपीलावर अनावधानाने सुनावणी घेण्यात आली नाही. मात्र विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २४.८.२०११ च्या पत्राने संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविल्याचे आयोगापुढे नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यांच्या दिनांक २२.१२.२००९ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास वनपरिक्षेत्र अधिकारी, जोडमोहा व हिवरी यांचेकडून माहिती प्राप्त झाली आहे. मात्र वनपरिक्षेत्र अधिकारी, यवतमाळ, घाटंजी, आर्णी, नेर व दारव्हा या ५ वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक यांनी संबंधित ५ वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २२.१२.२००९ च्या अर्जातील माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), यवतमाळ, घाटंजी, आर्णी, नेर व दारव्हा यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यवतमाळ, घाटंजी, आर्णी, नेर व दारव्हा यांच्याकडे अपीलकर्त्याचा दिनांक २२.१२.२००९ चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) यांचेकडून दिनांक २४.१२.२००९ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी हस्तांतरण केलेला आहे. तथापी त्यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे आंत कोणतीही माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. म्हणून विलंबाबद्यल त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस कां करु नये याचा लेखी खुलासा या पाचही वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी हा आदेश मिळाल्यानंतर आयोगाकडे १५ दिवसांत सादर करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक यांनी वर नमुद केलेल्या पाचही वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

४) प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी याची भविष्यात पुनर्रावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

५) या निर्णयाची एक प्रत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक यांनी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पाठवावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९४६- ९४९ /१५.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२९/२०११.

श्री. सदानंद श्रावणजी गणवीर,
अंबिकानगर, ता. जि. यवतमाळ - ४४५ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ.

श्री. डी. जी. मराठे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक वनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी नागपूर खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, यवतमाळ यांचेकडे माहे मार्च २०१० यवतमाळ वनविभागांतर्गत हिवरी वनपरिक्षेत्रातील ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२०११ रोजी प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे म्हणून अपील खारीज करावे असे रोजनामावर लेखी लिहून दिले व स्वाक्षरी केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९५०- ९५१ /१५.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८३३/२०११.**

श्री. सदानंद श्रावणजी गणवीर,
अंबिकानगर, ता. जि. यवतमाळ - ४४५ ००१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ.

श्री. आर. के. चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा,
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनविभाग, जोडमोहा, ता. जि. यवतमाळ. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी नागपूर खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग, यवतमाळ यांचेकडे जोडमोहा वनपरिक्षेत्राचा कारभार सांभाळण्याबाबत दोन मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२०११ रोजी सदर प्रकरणी माहिती मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे सांगितले व रोजनामावर स्वाक्षरी केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९५२- ९५३ /१५.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८३४/२०११.**

श्री. सदानंद श्रावणजी गणवीर,
अंबिकानगर, ता. जि. यवतमाळ - ४४५ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ.

श्री. मोहम्मद नय्यर
जनमाहिती अधिकारी तथा,
क्षेत्र लिपिक, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनविभाग, ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०११ रोजी राज्य मुख्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी नागपूर खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. पी. एस. मुसळे, वनपरिक्षेत्र अधिकारी, यवतमाळ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, यवतमाळ यांचेकडे दिनांक १ मार्च ते ३१ मार्च २००९ पावेतो रोखलेखा पुस्तिकेच्या व धनादेशाबाबतची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२०११ रोजी सदर प्रकरणी संपूर्ण माहिती मिळाली म्हणून अपील खारीज करण्यात यावे असे सांगितल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९५४- ९५५ /१५.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८३२/२०११.**

श्री. सदानंद श्रावणजी गणवीर,
अंबिकानगर, ता. जि. यवतमाळ - ४४५ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, ता. जि. यवतमाळ.

श्री. आर. के. चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा,
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनविभाग, जोडमोहा, ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र मा. मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दिनांक ६.५.२०११ च्या पत्राने प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी नागपूर खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १५.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. मराठे, सहाय्यक वनसंरक्षक, यवतमाळ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा निर्देशन अधिकारी, निर्देशन विभाग वनवृत्त, यवतमाळ यांचेकडे दिनांक १ जुलै २००६ ते १४ जुलै २०१० पर्यंत जोडमोहा वनपरिक्षेत्र अंतर्गत खोरद वनवर्तुळात पंतप्रधान पॅकेज अंतर्गत झालेल्या प्रत्येक कामाबाबत एकूण १० मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२०११ रोजी सदर प्रकरणी माहिती मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे सांगितले व रोजनाम्यावर स्वाक्षरी केली म्हणून सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८४०/२०११.**

श्री. नंदकिशोर शंकर गभणे,
मु. पो. ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया - ४४१ ८०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. के. वाय. टेंभुर्णे
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
स्व. बनारसीलाल अग्रवाल हायस्कूल,
ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. टी. के. तागड, समादेशक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्व. बनारसीलाल अग्रवाल हायस्कूल, सडक/अर्जुनी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सत्र २००३-०४ ते २०१०-११ चे हजेरी पत्रक, तपासणी अहवाल, पगार देयक रजिस्टर, सांख्यिकी माहिती मागितलेली होती. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यानी आयोगापुढे मानय केले. मात्र त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे राहिलेली माहिती त्यांना मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधींनी आयोगापुढे सांगितले की, स्व. बनारसीलाल अग्रवाल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सडक/अर्जुनी या हायस्कूलला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा वित्तीय सहाय्य प्राप्त झाले नाही. तथापी अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचे आदेशाप्रमाणे अपीलकर्त्यास दिनांक २८.३.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच मुख्याध्यापक यांनी आयोगासमोर दाखविली.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सदरचे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य किंवा अनुदान प्राप्त झालेले नाही म्हणून मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे कडील याचिका क्रमांक ५१३२/२००८ मधील निर्णयानुसार या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९५८- ९५९ /१६.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८४१/२०११.

श्री. नरेंद्र महादेवराव हाडके,
भिमनगर वार्ड, ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. प्रदिप गोहिल,
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.९.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्रमांक एनएचएआय/१२०२५१६/९८-पीआय दिनांक २२.५.२००२ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने कुठल्याही प्रकारचे परिपत्रक (नोटीफीकेशन/सरकुलर) काढले आहे काय किंवा काढले असल्यास त्याची प्रत देण्यात यावी. तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे दिनांक २२.५.२००२ चे पत्र नगर रचना आणि मुल्य निर्धारण विभागास परिपत्रक म्हणून वापरणे बंधनकारक आहे काय अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केल्याचे नमुद केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३.    जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ८.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध अभिलेखात घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याने अपेक्षिलेली माहिती त्यांचे कार्यासनाच्या अभिलेखात उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास दिनांक ५.४.२०११ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांचेकडील दिनांक ५.४.२०११ चे पत्र अपीलकर्त्यास उपलब्ध झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक २२.५.२००२ च्या पत्राचे अनुषंगाने नगर विकास विभागाने काही परिपत्रके किंवा नोटीफिकेशन काढले अगर कसे याबाबत त्यांना माहिती पाहिजे असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, नगर विकास विभागाकडून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक २२.५.२००२ च्या परिपत्रकाचे संदर्भातध्ये कोणतेही परिपत्रक किंवा नोटीफिकेशन नगर विकास विभागाने काढले नाही म्हणून ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक २२.५.२००२ च्या पत्राचे अनुषंगाने नगर विकास विभागाकडून कोणतेही परिपत्रक किंवा नोटीफिकेशन निर्गमित करण्यात आले नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९६०- ९६१ /१६.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८४५/२०११ व अपील क्रमांक ८४६/२०११.

श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर,
विशाखा निवास, अजयनगर,
अंबाझरी हिल टॉप, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रविण देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. पी. बी. ढाले,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, मोहगांव (झिल्पी),
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. एन. डब्ल्यु. खंडाळ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. आर. सी. साळुंके,
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, वागदरा,
ता. हिंगणा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०११ व दिनांक २३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक

... २

१७.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत दोन्ही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत व माहितीचा विषय हा देखील एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. **<u>अपील क्रमांक ८४५/२०११</u> :-** अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मोहगांव झिल्पी, ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामपंचायत, मोहगांव झिल्पीच्या संदर्भात दिनांक १.१.२००९ ते दिनांक २५.११.२०१० पर्यंत या कालावधीतच्या ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकांचे अधिकार व कर्तव्याबद्यलची माहिती, ग्रामसेवक व अधिकारी कर्मचारी यांचे वेतन इत्यादी संदर्भात माहिती मागितलेली होती. त्यांना ३० दिवसांत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांचेकडे दिनांक २७.१२.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची असल्यामुळे निश्चित स्वरुपात कोणती माहिती पाठवावी याचा बोध होत नसल्यामुळे त्यांनी जावक क्रमांक क्यू/१०, दिनांक ९.१२.२०१ रोजी पोस्टाने पत्र पाठवून असे कळविले की, आपल्या माहितीच्या अर्जात आपण मागितलेल्या माहितीचा बोध होत नाही म्हणून आपणास हव्या असलेल्या माहितीबाबत मुद्येसुद कळवावे किंवा प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी. मात्र सदरचे पत्र त्यांना पोस्टाद्वारे पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर दाखविला. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्रापत झाले नाही असे आयोगासमोर अपीलकर्त्यान सांगितले.

५. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. सुनावणी नंतर दिनांक ८.२.२०११ रोजी निर्णय निर्गमित केल्याचे प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकारात जी माहिती हवी आहे याबाबत स्पष्ट व लेखी कळवावे व माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला.

६.	त्यावर अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या माहितीच्या अर्जात त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यामध्ये ग्रामपंचायतची रचना, ग्रामसेवकांचे अधिकार इत्यादी बाबत एकूण १२ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्या मुद्यांला अनुसरुन ग्रामपंचायतीकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असले त्या स्वरुपात त्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

७.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जशा स्वरुपात माहिती ग्रामपंचायतकडे उपलब्ध असेल त्या स्वरुपातील माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

८.	**अपील क्रमांक ८४६/२०११ :-** अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वागदरा, ता. हिंगणा यांचेकडे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली मात्र अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना संपूर्ण मुद्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

९.	जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्त्यास दिनांक २१.१.२०११ च्या पत्राने माहिती दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ ते ४ ची माहिती व मुद्या क्रमांक १० ची माहिती जशा स्वरुपात उपलब्ध असेल तशा स्वरुपात अपीलकर्त्यास विनामुल्य ७ दिवसांत उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८४५/२०१० व अपील क्रमांक ८४६/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत दोन्ही जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास ग्रामपंचायत कार्यालयाकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८४७/२०११.**

श्री. शंकर मोडकुजी मेश्राम,
द्वारा - वासुदेव दुर्गे, नगिनाबाग,
प्रोफेसर कॉलनी, महात्मा फुले चौक,
वार्ड नं. २, ता. जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. ई. भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक (प्रशासन)
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
ता. जि. चंद्रपूर.

श्री. मांडावेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
अध्यक्ष,
हिवताप कर्मचारी सहकारी पत संस्था मर्यादित,
जिल्हा हिवताप कार्यालय, बोकारे प्लॉट, रामनगर,
चंद्रपूर - ४४२ ४०१. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. ॲड. वा. मे. खेळकर हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, जिल्हा हिवताप कर्मचारी पतसंस्था, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन या पतसंस्थेची सुमारे २८ वर्षाची एकूण १३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना संस्थेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १०.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचेवतीने ॲड. श्री. खेळकर, यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची संस्था ही कर्मचारी पतसंस्था असून या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य किंवा अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडील डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँकेच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र लॉ जनरल पान ३६४ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याबाबत संस्थेस लागू पडत नाही. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संस्थेने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ५.४.२०११ रोजी माहितीचे शुल्क रुपये ५००/- भरण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानंतरही अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे वकीलांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, माहितीचे शुल्क भरण्यास ते तयार आहेत. माहितीचे शुल्क भरण्यास सुध्दा ते कार्यालयात हजर झाले परंतु त्या दिवशी संस्थेच्या कार्यालयात शुल्क घेण्यासाठी कोणीही हजर नसल्यामुळे शुल्क भरता आले नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणात सदरची संस्था ही सहकारी कायद्याखाली नोंद झालेली असल्यामुळे त्या सहकारी संस्थेवर नियंत्रण सहकार विभागाचे आहे ही बाब लक्षात घेता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अपीलकर्त्यास संस्थेस माहितीचे शुल्क भरणा करण्याची कार्यवाही करुन अपीलकर्त्याने माहिती शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी अपीलकर्त्याचे माहितीचे शुल्क संस्थेत भरणा करुन घेण्याची कार्यवाही करावी व अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंबर संस्थेकडून अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९६६- ९६८ /१७.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८४९/२०११.

श्रीमती वंदना जर्नादन डोंगरे,
क्वॉर्टर नं. ए-२/२, डॉक्टर कॉलनी,
अजनी रेल्वे स्टेशन समोर, नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २६.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. डॉ. बारसागडे हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. दोरवे, मुख्य प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १८.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांचेकडे घरभाडे भत्त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्तीस माहिती मिळाल्याचे सांगितले व रोजनाम्यावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... २

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१२/२०११.

श्री. मच्छिंद्र आवळे,
१२, कानफाडेनगर, वर्धा रोड,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. पासेबंद,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास, अंबाझरी, नागपूर - ४४० ०१०.

श्री. पी. डी. गांगुली,
जनमाहिती अधिकारी तथा,
विभागीय अधिकारी (पश्चिम),
नागपूर सुधार प्रन्यास, अंबाझरी, नागपूर - ४४० ०१०. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (पश्चिम), अंबाझरी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नागपूर सुधार प्रन्यास कार्यालय, अंबाझरी, नागपूर यांनी आमदार देवेंद्र फडणवीस यांचे पत्र व पत्रासोबत तक्रार अर्जानुसार मौजा अजनी, सर्व्हे क्र. ७२/२, कानफाडेनगर येथील मच्छिंद्र आवळे यांचे टिनाचे शेड व इतर साहित्य

... २

कोणतीही सुचना न देता दिनांक ५.१०.२००७ रोजी उचलून नेले आहे. तसेच दिनांक ६.१०.२००७ रोजी याच जागेवरील तारेचे कंम्पाऊंड व नावाचा बोर्ड नेला आहे. या प्रकरणी फाईल मधील सर्व कागदपत्रे/दस्ताऐवज व कार्यालयीन टिपणीची माहिती साक्षांकित करुन छायाप्रती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १४.३.२०११ च्या पत्राने असे कळविले की, विषयांकित खसरा क्रमांक ७२/२ मौजा अजनी, कानफाडे नगर येथील धारिका या कार्यालयात उपलब्ध असून आपण कार्यालयीन वेळेत धारिकेचे अवलोकन केल्यास आपणास आवश्यक असलेले दस्तावेज नियमानुसार उचित शुल्क आकारुन छायाप्रतीत देता येतील असे त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता (पश्चिम) यांचेकडे दिनांक २४.४.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलामध्ये १५ दिवसांचे आंत माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय निर्गमित केला. त्याला अनुसरुन त्यांना माहिती मिळाली. परंतु अपुर्ण माहिती उपलब्ध झाली. त्या माहितीमध्ये दस्तऐवज क्रमांक १ ते ११७ असे दाखविले आहे. परंतु त्यातील पेज क्रमांक ११, ३०, ३३, ७४, ८०, ८३, ८५ ते ९३, ९७, ९८ असे एकूण २३ पाने मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना दिनांक १४.३.२०११ रोजी पत्र पाठविण्यात आले व त्यामध्ये धारिकेचे निरिक्षण करुन घेऊन आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क भरणा करावा असे कळविले. तथापी अपीलकर्त्याने धारिकेचे निरिक्षण करण्यासाठी त्यांचे कार्यालयात आले नाही. त्यानतर अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्त्यास संबंधित धारिका दाखविण्यात आली व त्या धारिकेतील छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र १ ते ११७ पेजेस मधील वर नमुद केलेले पेजेस असे एकूण २३ पानांची झेरॉक्सप्रती त्यांना मिळाल्या नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास धारिकेतील ज्या २३ पानांच्या छायांकित प्रती झेरॉक्स काढतांना नजर चुकीने देण्याच्या राहिलेल्या आहेत त्या २३ पानांच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केलेल्या २३ पेजेसच्या छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८५५/२०११.**

सौ. विजया वासुदेवराव सादमवार,
बियानी पेट्रोलपंप समोर, स्टेट बँक कॉलनी,
तुकुम, ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
मातोश्री विद्यालय, तुकुम,
ता. जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
पर्यवेक्षक,
मातोश्री विद्यालय, तुकुम,
ता. जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २४.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती ही गैरहजर आहे व उत्तरवादी यांचेतर्फे ॲड. श्री. आर. बी. खनके हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती ही गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. मात्र उत्तरवादी यांचे वतीने हजर असलेले ॲड. खनके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २.३.२०११ चा माहितीचा अर्ज दिनांक ४.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने माहितीच्या अर्जात शाळेतील शिक्षक हजेरी पुस्तका संबंधात तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस दिनांक २६.३.२०११ च्या पत्राने १ ते ९ मुद्यांवर

... २

माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे कळविले की, मुद्या क्रमांक १, २, ४ व ५ ची माहिती ही १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्यामुळे ती उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक ३ ची माहिती ही १ वर्षाचे कालावधीनंतर ठेवल्या जात नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भात कोणतीही माहिती किंवा पुस्तक त्यांचेकडे तयार केलेले नाही असे कळविले व मुद्या क्रमांक ९ च्या बाबत दुय्यम सेवापुस्तकही शाळेजवळ नाही म्हणून त्याची प्रत देता येत नाही. तसेच मुद्या क्रमांक १ ते ८ च्या संदर्भातील माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे शाळेच्या एकूण ५००० विद्यार्थ्यांची आपण माहिती मागितल्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची कार्यवाही ही फार मोठया स्वरुपाची आहे. तसेच आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(ई) प्रमाणे कोणतेही जनहित त्यामध्ये दिसून येत नाही. म्हणून सदरची माहिती आपणास देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस कळविले व त्याबाबतची पोच वकीलांनी आयोगासमोर दाखविली. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील दिनांक १९.४.२०११ रोजी दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात येऊन जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्यामुळे अपीलकर्तीचे प्रथम अपील फेटाळल्याचे ॲड. यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रस्तुत प्रकरणी ॲड. खनके यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शाळा संहिता तयार केली आहे आणि त्यामध्ये माध्यमिक शाळेंनी ठेवावयाच्या अभिलेखाचा जतन कालावधी त्यामध्ये निश्चित केला आहे. त्यानुसार अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्यामुळे ती कागदपत्रे जतन करण्यात आलेली नाही म्हणून ॲड. खनके यांनी माध्यमिक शाळा संहितेच्या अभिलेख जतन करण्याचा कालावधीची प्रत आयोगास सादर केली.

५. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले ॲड. खनके यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्तीने माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीपैकी त्यांचे स्वतःच्या दुय्यम सेवापुस्तकाची प्रत मागितलेली आहे. शाळेकडे दुय्यम सेवापुस्तिका नाही. मात्र शाळेकडे मुळ सेवापुस्तिका आहे असे ॲड. खनके यांनी आयोगापुढे नमुद केले. म्हणून अपीलकर्तीस मुळ सेवापुस्तिकेची झ ेरॉक्स प्रत शुल्क आकारुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस मुळ सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत माहितीचे शुल्क आकारुन उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी अपीलकर्तीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी हजर राहून माहितीचे शुल्क भरुन सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत प्राप्त करावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६४/२०११.**

श्री. हरिश सुधाकर रेहेकवार,
किल्ला वार्ड, जुनी वस्ती,
पो. ता. तिरोडा, जि. गोंदिया - ४४१ ९११. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तिरोडा, जि. गोंदिया.

श्री. डी. पी. तिवडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
बांधकाम लिपिक,
नगर परिषद, तिरोडा, जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. के. जी. धकाते, मुख्य लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा बांधकाम लिपिक, नगर परिषद, तिरोडा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन अवैध बांधकामासंबंधी एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही.

३. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा बांधकाम लिपिक, नगर परिषद, तिरोडा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक २०.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.

अपीलकर्त्याने अवैध बांधकामाबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याचे माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक ८.३.२०११ च्या पत्राने एकूण ४ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक १ व २ च्या संदर्भात त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, श्री. सुरेश रेहेकवार यांचा दिनांक ३०.५.२००५, दिनांक १.६.२००५ व दिनांक ४.६.२००५ चे तक्रार अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. त्यामुळे त्यावर कार्यवाही करता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याबाबत अपीलकर्त्याने आयोगा समोर दिनांक ३०.५.२००५, दिनांक १.६.२००५ व दिनांक ४.६.२००५ च्या तक्रार अर्ज नगरपरिषदेकउे सन २००५ मध्ये दाखल केले होते त्याची प्रत त्यांनी आयोगापुढे दाखविली. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपीलकर्त्याने दाखल केलेले तिन्ही अर्ज सुमारे ६ वर्षापुर्वी दाखल केलेले आहेत. सदरच्या अर्जाचा शोध संबंधित लिपिकाकडे व त्याचे कार्यालयाकडे घेण्यात आला. तथापी सदरचा अर्ज हा ६ वर्षापुर्वीचा असल्यामुळे तो त्यांचे कार्यालयात आजच्या घडीला उपलब्ध नाही. तथापी अपीलकर्त्याने सदरच्या अर्जाची प्रत जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिल्यास त्या अर्जावर कार्यवाही करुन त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे शक्य होईल. म्हणून अपीलकर्त्याने आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांना वर नमुद केलेल्या तिन्ही अर्जाच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या व जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सदरच्या अर्जावर नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन अपीलकर्त्यास माहिती देण्याचे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांचा दिनांक ३०.५.२००५, दिनांक १.६.२००५ व दिनांक ४.६.२००५ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९७७- ९७८ /२०.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९१४/२०११.

श्री. देविदास जगन्नाथ जोशी,
गाळा क्र. यु-९, लक्ष्मी विहार,
इमारत क्रमांक २, वर्धा रोड,
सोमलवाडा, नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु सिंचाई विभाग,
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. विजय बोंद्रे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपकार्यकारी अभियंता,
लघु सिंचाई विभाग, जिल्हा परिषद,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३०.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहिती अर्जात अपीलकर्त्याने दिनांक

... २

१४.७.२००० ते दिनांक ३०.९.२००० या कालावधीमध्ये उपविभागीय अधिकारी, रामटेक उपविभागात कार्यरत असतांना विभाग कार्यालयास सादर कागदपत्राच्या संदर्भात दिनांक ८.९.२००० च्या पत्राची सत्यप्रत व दिनांक २८.८.२००० च्या मुखपृष्ठासह जोडलेल्या एकूण ७४ सिमेंट मागणी पत्राची सत्यप्रत त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या मुळ प्रतीचा शोध त्यांचे कार्यालयात घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे मुळ दस्ताऐवज त्यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे माहितीच्या सत्यप्रती देणे शक्य झाले नाही व ही वस्तुस्थिती दिनांक ९.२.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आणखी असेही सांगितले की, त्यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक ६.१.२०११ च्या पत्राने उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, लधुसिंचाई, रामटेक यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविण्यात आला होता. तथापी त्यांनी त्यांचेकडील दिनांक ११.२.२०११ रोजीच्या पत्राने असे कळविले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या मुळ प्रती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात तसेच उपविभागीय अभियंता, रामटेक यांचे कार्यालयात देखील अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या मुळ प्रती उपलब्ध नसल्यामुळे अपीलकर्त्यास सत्यप्रतीलिपी देता आली नाही. तथापी अपीलकर्त्याने त्यांचे कार्यालयाकडे जो वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे त्यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात कागदपत्रे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचेकडून मुळ स्वरुपात जप्त केलेली दिसून येतात. म्हणून त्या कागदपत्राच्या मुळ प्रती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने त्यांच्या माहितीच्या अर्जात नमुद केलेल्या कागदपत्राची मुळ प्रत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात किंवा उपविभाग, रामटेक यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याने अपीलकर्त्यास त्या माहितीच्या सत्यप्रतीलिपी उपलब्ध करुन देता येत नाही ही वस्तुसिथती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.२.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९७९- ९८१ /२०.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६६/२०११.

श्री. माधव सुकाजी करचल,
मु. खापरी, पो. सोनसरी,
ता. कुरखेडा, जि. गडचिरोली - ४४१ २०९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक.

जनमाहिती अधिकारी तथा,
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचेवतीने श्री. वाघमारे, महाव्यवस्थापक (गोंडवन) विभागीय कार्यालय नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने हजर असलेले प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.९.२०१० चा माहितीचा अर्ज अपीलकर्त्याने नाशिक कार्यालयाकडे पाठविला होता. त्या कार्यालयाकडे दिनांक १७..१.२०११ रोजी अर्ज प्राप्त झाला. सदरच्या अर्जात अपीलकर्त्याने त्यांची सेवा पुर्नस्थापनेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन महाव्यवस्थापक

... २

(प्रशासन), महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांनी अपीलकर्त्यास अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, आपली सेवा पुर्नस्थापित करणेबाबत आवश्यक त्या कायदेशिर बाबींची पुर्तता करण्याबाबत उदा.:- प्रतिज्ञा पत्रासाठी आपण स्वतः मुख्यालयास दिनांक १३.९.२०११ च्या आत उपस्थित राहावे असे अपीलकर्त्यास त्यांनी कळविलेले होते व सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याबाबत पोच आयोगासमोर दाखविली. तथापी अपीलकर्ता मुख्यालयात उपस्थित राहून प्रतिज्ञापत्र त्यांनी दाखल केले नाही. त्यामुळे अपीलकर्त्याची सेवा पुर्नस्थापित करण्याबाबतची कार्यवाही अद्याप झालेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे दिसून येते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९८२- ९८३ /२०.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६०/२०११.**

श्री. देवराव नत्थुजी चटप,
२०, ओंकारनगर, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागपूर.

श्री. खंडागळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. अनिल आकुलवार, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. वसंत नंदनवार (सेवानिवृत्त) शिक्षकांच्या मुळसेवा पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०११ रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे लेखी निवेदन सादर करुन माहितीचा

... २

अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली माहिती मला दिनांक ४.९.२०११ ला मिळाली. त्यामुळे द्वितीय अपील अर्ज खारीज करण्याकरिता विनंती अर्ज सेवेशी सादर करीत आहे. असे अपीलकर्त्याने लेखी निवेदनामध्ये लिहून दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९८४- ९८५ /२०.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६५/२०११.**

श्री. मनोहर श्रीराम हरडे,
मु. पो. शहापूर, ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

सौ. सुनैना विभांडीक पिंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा,
कार्यवाह,
ग्राम विकास समिती, शहापूर,
ता. जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र त्यांनी द्वितीय अपील अर्जात संलग्न केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी दिनांक १३.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/कार्यवाह, ग्राम विकास समिती, शहापूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्राम विकास समिती, शहापूर या संस्थेतील दरवर्षी ऑडीट होतो. त्या प्रत्येक वर्षाच्या ऑडीटच्या झेरॉक्स प्रती सन १९७५ ते २००५ असे सुमारे ३० वर्षाची ऑडीटच्या कॉपी मागितलेल्या दिसून येतात. अपीलकर्त्याच्या

... २

माहिती अर्जाला अनुसरुन कार्यवाह तथा सेक्रेटरी, ग्राम विकास समिती, शहापूर यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३१.१.२०११ च्या पत्राने असे कळविले आहे की, आपण माहितीच्या अधिकारांतर्गत ग्राम विकास समिती, शहापूरच्या सन १९७५ ते २००५ हया कालावधीच्या ऑडीट शिटची मागणी केलेली आहे. आपण ३० वर्षाच्या ऑडीट शिटची मागणी केलेली आहे व एवढया मोठया कालावधीतील जुना रेकॉर्ड शोधण्याचे काम सुरु आहे. रेकॉर्डचा शोध लागताच आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यावर अपीलकर्त्याने त्यांना पुन्हा कार्यवाह, ग्राम विकास समिती, शहापूर यांना दिनांक १४.२.२०११ च्या पत्राने असे कळविले की, त्यांनी १ महिन्याचे मुदतीत ऑडीट शिटची सत्यप्रत सहि शिक्कानिशी पाठवावी. म्हणजे येणारा खर्च ते देण्यास तयार आहेत. त्याला अनुसरुन पुन्हा कार्यवाह, ग्राम विकास समिती, शहापूर यांनी अपीलकतर्यास दिनांक ८.३.२०११ च्या पत्राने असे कळविले की, सन १९७५ ते २००५ या कालावधीचे आपण मागणी केलेले ऑडीट असेसमेंटस् अतिशय पुरातन असल्यामुळे ते शोधण्याचे काम सुरु आहे. ते प्राप्त होताच आपणास सुपुर्द करण्यात येतील.

३. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक १४.३.२०११ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केला व त्यामध्ये असे नमुद केले की, माहिती अधिकारी तथा कार्यवाह, ग्राम विकास समिती, शहापूर यांची प्रथम अपीलीय अधिकार हे सहाय्यक धर्मादाय आयुक्त नाहीत. सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे त्यांचे कार्यालयातील माहिती अधिकाराबाबत प्रथम अपीलीय अधिकारी आहेत असे नमुद केले व सदरचे प्रथम अपील त्यांचे अधिकार क्षेत्रात येत नसल्यामुळे अपील नामंजूर केलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे सुमारे ३० वर्षाची माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती शोधण्याचे काम सुरु असून ती उपलब्ध झाल्यानंतर ९० दिवसांचे आत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे दिनांक ८.३.२०११ च्या पत्राने कार्यवाह, ग्राम विकास समिती, शहापूर यांनी अपीलकतर्यास कळविल्याचे दिसून येते. म्हणून कार्यवाह यांनी अपीलकर्त्यास सद्य:स्थितीत त्यांचेकडे जितक्या वर्षाची माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा कार्यवाह, ग्राम विकास समिती, शहापूर यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती व्यक्तिशः किंवा पोस्टाने अपीलकर्त्याला विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९८६- ९८८ /२०.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५५/२०११.

श्री. प्रल्हाद रामभाऊ कपले,
प्लॉट नं. २३६, भाऊसाहेब सुर्वे नगर,
रिंग रोड, कालीमंदीराजवळ, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बाळासाहेब बबन दौंडकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,
गृह विभाग, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, कलीना,
सांताक्रुझ (पुर्व), मुंबई - ४०० ०९८.

श्री. राजेंद्र मावळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक संचालक,
न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,
गृह विभाग, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, कलीना,
सांताक्रुझ (पुर्व), मुंबई - ४०० ०९८. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र त्यांनी लेखी निवेदन सादर करुन त्यात असे नमुद केले आहे की, त्यांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळण्यास बराच विलंब झाला व त्यामुळे त्यांचे व्याजाचे नुकसान झाले.

... २

३.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १३.१२.२०१० रोजी पोस्टाद्वारे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने भविष्य निर्वाह निधी व सहाव्या वेतन आयोगाच्या पहिला व दुसरा हप्ता देणे संदर्भात झालेल्या विलंबाचे कारणांची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ११.१.२०११ च्या पत्राने मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये मुद्या क्रमांक १ याबाबत असे नमुद केले की, महालेखाकार (लेखा व हकदारी) २ महाराष्ट्र, नागपूर यांचेकडून प्राधिकार पत्र प्राप्त न झाल्यामुळे व प्राधिकाराची वैधता संपल्यामुळे पुनवैधीकरणासाठी महालेखाकार, नागपूर यांना पत्र पाठविलेले आहे. म्हणून संबंधित कार्यालयाकडून पुनवैधीकरण प्राधिकार पत्र प्राप्त झाल्यानंतर व्याजाची रक्कम प्रदान करण्यात येईल व त्याबाबत संबंधित पत्राच्या प्रती जोडण्यात आल्या व मुद्या क्रमांक २ बाबत असे कळविले की, सहाव्या वेतन आयोगाच्या पहिला व दुसरा हप्त्याचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रा, मुंबई येथे सादर करण्यात आलेले आहे अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे आयोगापुढे सांगितले.

४.	त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दिनांक ५.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २२.३.२०११ रोजी ठेवली व प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. सुनावणीचे वेळी अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समक्ष असे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून जी माहिती प्राप्त झालेली आहे ती खोटी आहे असा त्यांनी दावा केला. त्याबाबत माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी महालेखाकार, नागपूर यांचेकडे दिनांक १६.३.२००९ व दिनांक १५.९.२००९ या तारखांना पत्र पाठविलेले आहे. तथापी दिनांक १६.३.२००९ च्या पत्राची मुळ प्रत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही व दिनांक १५.९.२००९ च्या पत्राची मुळप्रत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध आहे याची जाणीव अपीलकर्त्यास सुनावणीचे वेळी करुन दिली. त्याबाबत अपीलकर्त्याचे सुनावणीचे वेळी समाधान झाले. म्हणून प्रथम अपीलाचे निर्णयात मुद्या क्रमांक २ मध्ये माहिती अधिकारामध्ये दिलेली दिनांक १६.३.२००९ च्या पत्राची मुळ प्रत आढळून येत नाही अशी माहिती अपीलकर्त्यास

उपलब्ध करुन देऊन अपील निकाली काढण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास असेही निदर्शनास आणून दिले की, महालेखाकार, नागपूर यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी जे पत्र दिलेले आहे ते प्रत्यक्षात मुळ पत्र नाही. प्रत्यक्षात महालेखाकार, नागपूर कडून पाठविलेले पत्र हे दिनांक १५.९.२००९ चे आहे. म्हणून दिनांक १६.३.२००९ चे पत्र हे बनावट असल्याची बाब संचालक, न्यायसहायक वैधानिक प्रयोगशाळा, मुंबई यांचे निदर्शनास दिनांक ४.५.२०११ च्या संयुक्त पत्राने आणून दिलेले असून त्याबाबत योग्य ती कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक ६.१२.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ११.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १६.३.२००९ चे महालेखाकार, नागपू यांचेकडे पाठविण्यात आलेले बनावट पत्र तयार केल्याबाबतची बाब संचालकाचे निदर्शनास आणून दिली असून संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९८९- ९९१ /२१.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७१/२०११.

श्री. उमेश एल. गजभिये,
न्यु आशिर्वादनगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वि. सा. शिंदे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख,
प्रशासकीय इमारत, खोली क्रमांक २१३, जि. गोंदिया.

श्री. एम. एस. आरीफ,
जनमाहिती अधिकारी तथा,
शिरस्तेदार,
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख,
प्रशासकीय इमारत, खोली क्रमांक २१३, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख, गोंदिया यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती, महाराष्ट्र यांनी आपल्या कार्यालयात दिनांक १८.१२.२०१० ला तक्रार दिली होती. त्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाची व कार्यवाहीची प्रत त्यांनी मागितलेली होती. तसेच अर्जदाराने केलेल्या

... २

अर्जाची व सोबत जोडलेल्या सहपत्राची साक्षांकित सत्यप्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.२.२०११ रोजी अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, आपले दिनांक १८.१२.२०१० चे अर्जानुसार उपअधिक्षक, भूमी अभिलेख, सडक अर्जुनी यांचेकडून अहवाल प्राप्त झलेला नसल्याने सदर अहवालाची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही. तथापी इतर कागदपत्राच्या एकूण २५ प्रती करिता त्यांनी रुपये २/- प्रमाणे ५०/- रुपये माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती घेऊन जावी असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.१.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक ९.२.२०११ रोजी पत्र पाठवून असे कळविले की, आपले दिनांक १८.१२.२०१० च्या अर्जाचे संदर्भात उपअधीक्षक, भूमी अभिलेख, सडक अर्जुनी यांचेकडून अहवाल प्राप्त झाला नसल्याने त्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही. तथापी इतर कागदपत्राच्या प्रतीचे शुल्क रुपये ५०/- भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. मात्र अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आता अपीलकर्त्याने मागितलेल्या दिनांक १८.१२.२०१० च्या अर्जाचे संदर्भात चौकशी अहवाल त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. त्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.२.२०११ च्या पत्राने इतर कागदपत्राचे माहितीचे शुल्क रुपये ५०/- भरण्याबाबत कळविले आहे. त्यामाहितीचे शुल्क भरणा करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे देखील त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.२.२०११ रोजी माहितीचे शुल्क रुपये ५०/- भरण्याबाबत कळविले होते. म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त

करुन घेणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्त्याने दिनांक १८.१२.२०१० च्या अर्जातील मागितलेल्या चौकशी अहवालाची प्रत आता उपलब्ध झाल्यामुळे ती प्रत देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीच्या शुल्काचा भरणा करुन इतर माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १८.१२.२०१० च्या अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत ७ दिवसाचे आंत विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९९२- ९९४ /२१.९.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७०/२०११.

श्री. रमेश चंद्रभान यावलकर,
न्यु आशिर्वादनगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. देवरी, जि. गोंदिया.

श्रीमती अल्का शिंगाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
तहसीलदार,
ता. अर्जुनी/सडक, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तहसील कार्यालय, अर्जुनी/सडक यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, गोंदिया यांचे कार्यालयाकडून दिनांक १८.१२.२०१० च्या अर्जावर झालेली कार्यवाही व खंड विकास अधिकारी, अर्जुनी/सडक यांचे कार्यालयाकडे आवक जावक रजिस्टरमध्ये खोडतोड करुन चुकीची माहिती मिळाल्यासंबंधी केलेल्या अर्जावर जी कार्यवाही झालेली आहे त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती.

... २

३.    जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्रापत झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया यांचेशी व खंड विकास अधिकारी, अर्जुनी/सडक यांचेशी संबंधित असल्यामुळे दिनांक २४.१.२०११ चे पत्रानुसार सदरचा माहितीचा अर्ज उपअधिक्षक, भूमी अभिलेख, अर्जुनी/सडक व खंड विकास अधिकारी, अर्जुनी/सडक यांचे कार्यालयाकडे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविला आहे. त्यानुसार उपअधिक्षक, भूमी अभिलेख, अर्जुनी/सडक यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी/सडक यांनी दिनांक १४.७.२०११ च्या पत्राने ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, सडक/अर्जुनी यांचेकडे खाडाखोडीच्या संदर्भात कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे. त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास त्यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्विकृत केली. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही तहसीलदार कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे सदरची माहिती संवर्ग विकास अधिकारी व उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयाशी संबंधित होती. त्या कार्यालयांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९९५- ९९६ /२१.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८६९/२०११.**

सौ. रेखाताई राजीव कऱ्हाड,
न्यु आशिर्वादनगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
ता. जि. गोंदिया.

श्री. आर. सी. कुंभलवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
ता. जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १४.१२.२०१० च्या अर्जावर अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, गोंदिया यांचे कार्यालयाकडून झालेल्या कार्यवाहीबाबत तसेच आवक जावक रजिस्टरमध्ये खोडतोड करुन चुकीची माहिती मिळण्याबाबत खंड विकास अधिकारी, अर्जुनी/सडक यांचेकडून झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती.

... २

३. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गोंदिया यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक १४.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यीस दिनांक ४.२.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपला दिनांक १४.१२.२०१० रोजीचा अर्ज या शाखेस प्राप्त झाला नाही म्हणून त्या अर्जाच्या प्रतीसह या कार्यालयात स्वतः हजर राहावे म्हणजे कार्यवाही करता येईल असे अपीलकर्तीस कळविले. तथापी अपीलकर्ती त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १४.१२.२०१० चा अर्जासह हजर झाले नाही म्हणून अपीलकर्तीस दिनांक १४.१२.२०१० च्या अर्जावर कार्यवाही करता आली नाही. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक १७.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपील त्यांचे नामंजूर करण्यात आले. म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

४. अपीलकर्तीच्या दिनांक ४.१.२०११ च्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, गोंदिया यांचेशी संबंधित आहेत. त्याचप्रमाणे काही माहिती खंड विकास अधिकारी, अर्जुनी/सडक यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. तसेच अशाच प्रकारच्या माहिती बाबत यापुर्वी आयोगाकडे अपील क्रमांक ८७०/२०११ दाखल झालेला आहे. त्यात नमुद केलेल्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्तीस अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालयाकडून झालेल्या कार्यवाहीची प्रत व खंड विकास अधिकारी, अर्जुनी/सडक यांनी केलेल्या कार्यवाहीची प्रत अपीलकर्तीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. म्हणून अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९९७- ९९८ /२१.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९२४/२०११.

श्री. अक्षय विलासराव राऊत,
मु. पो. खुबगांव,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजय दैने,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन),
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. मिलिंद देशकर, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १७.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पुनर्वसन अधिकारी, वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. राजेंद्र नानाजी राऊत यांना कोणत्या सर्व्हे नंबरवर धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात आले त्या धरणग्रस्त प्रमाणपत्राची प्रत व ७/१२ ची प्रत तसेच जर धरणग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतर केले असेल तर त्या व्यक्तीचे संमतीपत्राची झेरॉक्स प्रत. त्याचप्रमाणे राजेंद्र

... २

नानाजी राऊत यांना कोणत्या वर्षीला धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात आले ते वर्ष दिनांकासहीत देण्यात यावे व सदरचे प्रमाणपत्र देतांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी व जिल्हाधिकारी कोण होते त्यांचे संपूर्ण नावाची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने असे कळविले की, या कार्यालयात निम्न वर्धा प्रकल्पाचे प्रकल्पग्रस्ताचे दाखल्याचे रजिस्टर उपलब्ध आहे. त्या रजिस्टरची आपण पडताळणी करुन हवी असलेली माहिती आपण प्राप्त करुन घ्यावी. त्याप्रमाणे ते जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाले मात्र त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे दिनांक ३०.४.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १७.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदर अर्जात अपीलकर्त्याने मौजा हाशिमपूर, ता. आर्वी, जि. वर्धा येथील शेत सर्व्हे क्रमांक १०५, १३० आराजी २.७२ या वर्णनाचे शेताचे कागदपत्रावरुन कोणत्या व्यक्तिने धरणग्रस्त दाखला घेतला त्याची माहिती मागितली तसेच रविंद्र नानाजी राऊत यांना कोणता सर्व्हे क्रमांकाचे आधारे धरणग्रस्त म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले त्याची माहिती त्यांनी मागितली. त्याचप्रमाणे त्यावेळी जिल्हा पुनर्वसन अधिकारी व जिल्हाधिकारी कोण होते त्यांची माहिती त्यांनी मागितली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९९७-९८ या कालावधीतील जुनी माहिती असल्यामुळे त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या कार्यालयीन रेकॉर्डनुसार निम्न वर्धा प्रकल्पाचे प्रकल्पांतर्गत जवळ जवळ ३२०० दाखले निर्गमित झालेले दिसतात. मात्र अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे मुळ प्रकरण शोध घेतला असता मुळ प्रकरण आढळून आले नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ८.४.२०११ रोजी सदरचे प्रमाणपत्राचे दिलेल्या रजिस्टरची पडताळणी करण्यासाठी व त्यातील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना कार्यालयात बोलाविले. तथापी ते कार्यालयात रजिस्टर पाहणी करण्यास आले नाही. मात्र त्यांनी त्यानंतर प्रथम अपील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.७.२०११ रोजी पारित करण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या रजिस्टरच्या आधारे १५

... ३

दिवसांत अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती देण्याचे आदेश दिले. त्याला अनुसरुन सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.७.२०११ च्या पत्राने धरणग्रस्ताचे प्रमाणपत्र दिलेल्या रजिस्टरची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविली. सदरची माहिती त्यांनी दिनांक १५.७.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविल्याचा जावक रजिस्टरचा मुळ पुरावा आयोगासमोर दाखविला. त्यावरुन अपीलकर्त्यास दिनांक १५.७.२०११ चे पत्र पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. मात्र सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

४. सहाय्यक जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने श्री. राजेद्र नानाजी राऊत यांना धरणग्रस्त म्हणून दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत मागितलेली आहे. तथापी मागितलेल्या माहितीचे कोणतेही मुळ दस्तऐवज त्यांचे कार्यालयात आता उपलब्ध नाही. फक्त धरणग्रस्त म्हणून जे प्रमाणपत्र दिलेले आहे ते केस रजिस्टर फक्त त्यांचे कार्यालयाकडे आहे व त्यामध्ये ज्यांना धरणग्रस्त प्रमाणपत्र दिलेले आहे व कोणत्या सर्व्हे नंबरच्या आधारे त्यांना धरणग्रस्त प्रमाणपत्र दिलेले आहे त्याची नोंद या रजिस्टर मध्ये आहे. मात्र धरणग्रस्त म्हणून दिलेल्या मुळ प्रती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेले धरणग्रस्तांचे दाखले दिलेले रजिस्टरवरुन जी माहिती अपीलकर्त्यास पुरविणे शक्य आहे ती माहिती अपीलकर्त्यास लेखी स्वरुपात स्पष्टपणे विनामुल्य कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत त्यांचे कार्यालयात धरणग्रस्तांना दिलेल्या दाखल्याचे जे केस रजिस्टर आहे त्या केस रजिस्टरवरुन श्री. रविंद्र नानाजी राऊत व श्री. संजय नानाजी राऊत यांना दिलेल्या धरणग्रस्त दाखल्याचे संदर्भात कोणत्या सर्व्हे नंबरच्या आधारे दाखला दिलेला आहे व कोणत्या तारखेला दिलेला आहे व सदरचा दाखला दुसऱ्यांच्या नावावर हस्तांतर केला आहे किंवा कसे याची माहिती स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरचा दाखला ज्या वर्षात निर्गमित केलेला आहे त्यावेळी कार्यरत असलेले जिल्हा पुनर्वसन अधिकारी व जिल्हाधिकारी यांची नावे सुध्दा उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ९९९- १००२ /२२.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९२२/२०११.

श्री. गोपाल आर. यादव,
१०४, जुना सुभेदार ले आऊट,
शारदा चौक, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. खामगावकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर.

श्री. शिवदास पां. बावनगडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रशासकीय अधिकारी,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती बाबत व थकबाकी देण्याबाबत त्यांनी अर्ज दिला होता. त्यावर केलेल्या कार्यवाही त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून

... २

माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ७.४.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानतरही त्यांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ११.२.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही लेखा विभाग वर्ग-३ यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून दिनांक १५.२.२०११ च्या पत्राने माहिती मागविली. त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रुपये ३३/- भरण्याबाबत दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने कळविले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक १४.३.२०११ रोजी माहितीचे शुल्काचा भरणा केला व त्या दिवशी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. त्याबाबतची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यांना ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे थकबाकी मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केल्याचे नमुद केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीला अपीलकर्ता हे हजर होते. जनमाहिती अधिकारी तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.५.२०११ रोजी दिला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्यास ६ व्या वेतन आयोगाचे शिफारसीनुसार संचालनालयाचे दिनांक २८.४.२०११ च्या पत्राला अनुसरुन दिनांक १.१.२००६ ते कर्तव्य कालावधी पर्यंत (निलंबित होण्यापुर्वी) वेतन निश्चिती करण्यात यावी. तसेच ६ व्या वेतन आयागाचे शिफारसीनुसार सुधारित दराने निर्वाहभत्ता देय करण्यात यावा व अपीलकर्त्यास निलंबनाचे कारण व सदर प्रकरणाची सद्यःस्थिती लक्षात घेता अपीलकर्त्यास ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे थकबाकी देण्यात यावी किंवा कसे याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांची परवानगीसाठी पत्र पाठवावे असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला.

... ३

५. प्रथम अपीलाचे निर्णयाचे अनुषंगाने अपीलकर्त्यास दिनांक १.१.२००६ ते कर्तव्य कालावधी पर्यंत ६ व्या वेतन आयोगाचे शिफारसीनुसार वेतन निश्चिती करण्यात आली व सुधारित दराने निर्वाहभत्ता देण्यात येत आहे व थकबाकी देण्याबाबत संचालक यांचेकडे दिनांक १६.७.२०११ च्या पत्राने मार्गदर्शन मागितले आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, आणि संचालकांना थकबाकी देण्याबाबत मार्गदर्शन मागविण्याचे पत्राची प्रत देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

६. प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता हे निलंबित असल्यामुळे त्यांना ६ व्या वेतन आयोगाचे व महागाई भत्त्याची थकबाकी देण्यात यावी किंवा कसे याबाबत अधिष्ठाता यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना मार्गदर्शन मागितलेले आहे व त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १००३- १००५ /२२.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९२३/२०११.

सौ. बबीता ईश्वर रामटेके,
घर क्र. ३२६६/एफ/९, न्यु कैलास नगर,
जिन्नाथ किराणा स्टोअर्स समोर, कामगार रोड,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रबंधक (प्रशासन)
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ, नागपूर.

श्री. खापरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपप्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक १०.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती ही गैरहजर आहे व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती हया गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपप्रबंधक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक २३.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात

... २

अपीलकर्तीने त्यांच्या दिनांक १०.१.२०११ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपीलकर्तीचा दिनांक १०.१.२०११ च्या अर्जात त्यांनी अशी तक्रार केली होती की, त्यांचे घराचे शेजारी तसेच परिसरात केरकचरा, सांडपाणी व गडरचे दुषित पाणी दर ३-४ महिन्याने १५ वर्षापासून निघते. त्यामुळे परिसर दुषित झालेला आहे. महानगरपालिका झोन क्रमांक ३ येथे वारंवार तक्रार अर्ज दिलेले आहेत. त्यांचेकडून योग्य ती कार्यवाही होत नाही अशी नागपूर महानगरपालिका विषयी तक्रार होती. सदरचा दिनांक १०.१.२०११ चा तक्रार अर्ज मा. वरिष्ठ न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, नागपूर यांचे आदेशान्वये कार्यवाहीसाठी आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक ११.४.२०११ रोजी पाठविण्यात आलेला आहे अशी माहिती अपीलकर्तीस दिनांक १३.४.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्तीने पुन्हा दिनांक २५.४.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रत्यक्षात या अपील अर्जात देखील त्यांनी माहिती मागितली आहे. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस पुन्हा दिनांक २.५.२०११ च्या पत्राने मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपप्रबंधक यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.४.२०११ च्या पत्राने व दिनांक २.५.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १००६- १००७ /२२.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९२०/२०११.

श्रीमती मीनाबाई संभाजी वाटोरे,
रमाई बचत गट, सरदार पटेल महाविद्यालय जवळ,
गंजवार्ड, ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. पी. एम. वझलवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ८.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती ही गैरहजर आहे व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १४.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी शिक्षाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे जिल्हास्तरीय बालक्रिडा स्पर्धा आयोजनाबद्यल एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांनी दिनांक २२.९.२०११ रोजी फॅक्स संदेशाद्वारे माहिती अधिकारांतर्गत जिल्हास्तरीय बाल क्रिडा संम्मेलनाबाबत मागितलेली माहिती मला प्राप्त झालेली असून ती

... २

बरोबर आहे. याबाबतची सर्व माहिती मी वाचलेली असून मला आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली आहे. प्राप्त माहितीने माझे समाधान झाले असून मी केलेली अपील खारीज करण्यांस माझी काहीही हरकत नाही असे निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १००८- १००९ /२२.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५१/२०११.

श्री. घनश्याम जयनारायण ब्रजपुरिया,
गुजरी बाजार, कामठी, जि.नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. कामठी, जि.नागपूर.

श्री. डी. के. बेदरकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. कामठी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री शिव गृह निर्माण सहकारी संस्था, कामठी या संस्थेविषयी एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरच्या गृहनिर्माण संस्थेला कोणत्याी प्रकारचे शासनाकडून वित्तीय सहाय्य प्राप्त झाले नाही किंवा सदरच्या संस्थेला घर बांधण्यासाठी शासनाची जागा सुध्दा मिळालेली नाही. तथापी मागितलेल्या माहितीचे संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक १०.५.२०११ च्या पत्राने

... २

आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याने आयोगासमोर असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात त्यांना सदर गृह निर्माण संस्थेबाबत असलेल्या कागदपत्रांचे त्यांना निरिक्षण करावयाचे आहे. सहकार कायद्याच्या तरतुदीनुसार प्रत्येक सहकारी संस्थेची "अ" धारिका निबंधकाचे कार्यालयात असते असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडे या संस्थेची जी "अ" धारिका आहे ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२०११ रोजी कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून श्री शिवकृपा गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या "अ" धारिकेचे निरिक्षण करुन घेऊन त्यामधील पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता हे दिनांक २९.९.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उक्त संस्थेची "अ" धारिका त्यांचे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व निरिक्षणाअंती झाल्यानंतर शुल्क भरल्यानंतर अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०१०- १०११ /२३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५४/२०११.**

श्री. भाऊराव बाबुराव जिभकाटे,
मु. पो. मांढळ, ता. कुही, जि.नागपूर - ४४१ २१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. तालेवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. स. व सु विभाग क्रमांक १,
५४/६३३, मोहता अपार्टमेंट, पहिला माळा, काटोल रोड, छावणी,
नागपूर.

श्री. प्रदीपकुमार ढेकल पराते,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
उपविभाग कुही, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने ॲड. पी. बी. लिखीते हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, कुही, जि. नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. बाबुराव आडकू जिभकाटे यांचे शेतातील विज देयक दुरुस्तीबाबत भाऊराव बाबुराव जिभकाटे यांनी दिनांक ९.११.२०१० ला

... २

आपले कार्यालयात अर्ज दिलेला होता. त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दिनांक १५.४.२०११ रोजी दाखल केली. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन त्यांनी निर्णय दिला नाही त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दिनांक २०.४.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती १७ दिवसांचे विलंबाने प्राप्त झ ााल्यामुळे विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांचेवरती शास्तीची कार्यवाही करावी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ३० दिवसांत प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ४.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आय.टी.सेंटरकडून प्राप्त करावयाची होती. त्यांचेकडून ती माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक २०.४.२०११ च्या पत्राने पाठविली. तथापी सदरची माहिती ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. याबाबत अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दिनांक ४.३.२०११ रोजी त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत म्हणजे दिनांक २.४.२०११ रोजी पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची होती. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.४.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त करुन दिलेली आहे. म्हणून सुमारे १७ दिवस माहिती विलंबाने प्राप्त करुन दिलेली आहे. या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, सदरची माहिती आय.टी.सेंटर कडून प्राप्त करुन घेण्यासाठी उशिर लागला म्हणून ३० दिवसांचे मुदतीत माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आली नाही. वास्तविक पाहता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत आय.टी.सेंटर कडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुरविण्यात येईल असे कळविणे आवश्यक होते. मात्र तसे देखील कळविले नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यासारखा नाही.

४. तसेच प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने दिनांक १५.४.२०११ रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन ३० दिवसात प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही आणि सुमारे १७ दिवस माहिती उशिराने उपलब्ध करुन दिल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेवर रुपये ३०००/- शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली कार्यकारी अभियंता, सं. व सु. विभाग क्रमांक १, नागपूर यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये शासकीय खजान्यात जमा करावी आणि शास्तीच्या रकमेची संपूर्ण वसुली झालेनंतर चलानसह वसुलीचा अहवाल आयोगाकडे पाठवावा.

३) प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता, स. व सु. विभाग क्रमांक १, नागपूर यांचेकडे दिनांक १५.४.२०११ रोजी दाखल केल्यानंतर त्याची सुनावणी घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत आहे. म्हणून भविष्यात त्यांनी या बार्बीची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०१२- १०१४ /२३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५३/२०११.**

श्री. सारंग भाऊराव दाभेकर,
मु. गांधी वार्ड, पो. ता. चिमुर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. एम. पिल्लारीसेठ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

श्री. जांभुळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक वनपरिक्षेत्र अधिकारी,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, ताडोबा-अंधारी, व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प कार्यालय कोळसाकडून राबविण्यात येणाऱ्या कार्याची माहिती संदर्भात एकूण ८ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्रमांक ३, ४, ५ ची माहिती मिळाली मात्र इतर मुद्यांचेबाबत त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील वनसंरक्षक तथा

क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचेकडे दिनांक ३.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन त्यांना निर्णय मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनाक १३.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक १२.२.२०११ च्या पत्राने त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती मुद्येनिहाय पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगासमोर मान्य केले. मात्र सदरची माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती पाठविली आहे त्या माहितीच्या संदर्भातील त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेले दस्तऐवज त्यांना निरिक्षण करावयाचे आहे असे देखील अपीलकर्त्याने आयोगापुढे सागितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १२.२.२०११ च्या पत्राने मुद्येनिहाय जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.२.२०११ च्या पत्राने मुद्ये निहाय माहिती दिलेली आहे. दिलेल्या माहितीच्या संदर्भात आयोगासमार चर्चा करण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात दस्तऐवजाचे निरिक्षण करावयाचे आहे असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले व सदरच्या दस्तऐवजाचे निरिक्षण करु देण्यास जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२०११ रोजी सकाळी ११:०० वाजता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १२.२.२०११ च्या पत्राने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या संदर्भातील सर्व दस्तऐवजाचे निरिक्षण करुन घ्यावे व अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वरील सर्व दस्ताऐवज निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे.

३) सदरच्या दस्तऐवजाच्या निरिक्षणाची कार्यवाही अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समक्ष करावयाची आहे.

४) प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी अशा बाबींची पुनरावृत्ती करु नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०१५- १०१७ /२३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५२/२०११.**

श्री. विलास श्रावण पोईनकर,
मु. पो. नेरी, ता. चिमुर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. पी. के. सुरमवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
लघुलेखक,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन आरोग्य पर्यवेक्षक (विस्तार) यांचे मंजूर पदाबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २८.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले. 

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनां २८.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने आरोग्य पर्यवेक्षक यांची जेष्ठता सुची व बिंदू नामावली इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व माहितीच्या अर्जात माहिती व्यक्तिशः घेणार असे त्यांनी नमुद केल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक २३.१.२०११ च्या पत्राने मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती या कार्यालयास उपलब्ध असून आपण कार्यालयीन वेळेत दिनांक ६.२.२०११ पावेतो आल्यास आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. मात्र अपीलकर्ता सदरची माहिती घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात आले नाही. म्हणून त्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक २८.२.२०११ च्या पत्राने पोस्टाद्वारे सदरची माहिती पाठविण्यात आली. तथापी त्यांना फक्त जेष्ठता सुचीची प्रत मिळालेली आहे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगासमोर अपीलकर्त्यास दिनांक २८.२.२०११ च्या पत्राने पाठविलेल्या माहितीची एक जादा प्रत पुन्हा अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. ती माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले.

४. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०१८- १०१९ /२३.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५८/२०११.**

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

श्री. व्ही. जी. शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक १०.७.२००७ च्या पत्रान्वये

... २

पदोन्नती संदर्भात एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.४.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क रुपये २०/- मनीऑर्डरद्वारे जनमाहिती अधिकारी यांचेकडे पाठविले परंतु त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दिनांक १३.५.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलानंतर त्यांना मुद्या क्रमांक २ ची माहिती प्राप्त झाली. परंतु मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २५.४.२०११ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पोस्टाने पत्र पाठविले. तथापी अपीलकर्त्याने मनीऑर्डरद्वारा पाठविलेले माहितीचे शुल्क अद्यापपर्यंत त्यांना प्राप्त झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही. तथापी अपीलकर्त्याने आयोगासमोर असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना अद्याप प्राप्त झाली नाही.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क मनीऑर्डरद्वारे जे पाठविले होते ते जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाले नसल्यामुळे त्यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तथापी आयोगासमोर जनमाहिती अधिकरी यांनी मुद्या क्रमांक १ ची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली व माहिती मिळाल्याबद्यल समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०२/२०११.**

श्री. भगीरथ दलीरामजी नागलवाडे,
१८, गुजराथी कॉलनी, गणेशपूर,
ता. जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. विकास ढोमणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य, जे. एम. पटेल महाविद्यालय,
ता. जि. भंडारा.

श्री. सुमंत देशपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्राध्यापक, जे. एम. पटेल महाविद्यालय,
ता. जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते व या द्वितीय अपीलाची सुनावणी घेऊन आयोगाने दिनांक २०.५.२०१० रोजी निर्णय पारित केलेला होता. सदरच्या निर्णयाला जे. एम. पटेल आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालय, भंडारा व जनमाहिती अधिकारी यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडे रिट याचिका क्रमांक ३००९/२०१० दाखल केली होती. सदरच्या रिट याचिकेची सुनावणी मा. उच्च न्यायालयात झाली व सदरच्या रिट याचिकेचा निर्णय मा. उच्च न्यायालयाने दिनांक २५.८.२०११ रोजी निर्गमित केला व सदरच्या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने राज्य माहिती आयुक्त यांना निर्देश देऊन अपीलकर्त्याच्या दिनांक ८.२.२०१० च्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ३ मुद्यांच्या माहितीबाबत फेरसुनावणी घेऊन मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडील सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन विरुध्द आदिल्य बंडोपाध्याय व इतर यांचेकडील सन २०११ मधील एसटीपीएल(Web) ६८५ SC च्या निर्णयातील मुद्या लक्षात घेऊन अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील १ ते ३ मुद्यांच्या बाबत फेरसुनावणी घेऊन निर्णय देण्याचे आदेश दिलेले आहे.

... २

२. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे उपरोक्त आदेशाला अनुसरुन प्रस्तुत अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.९.२०११ रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीचे वेळी अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर होते. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक १ ते ३ च्या संदर्भात कार्यवाही करणे संयुक्तिक व न्यायोचित होईल. अपीलकर्त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सन २००९-२०१० या वर्षाची त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. तथापी सन २००५-०६, २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ या वर्षाची माहिती त्यांचेकडे आज रोजी उपलब्ध नाही. तसेच सदरच्या माहितीची व्याप्ती सुध्दा मोठया प्रमाणात असल्याचे दिसून येते व अशा प्रकारच्या माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित दिसून येत नाही. तथापी सन २००९-१० ची जी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संबंधीचे दस्तऐवज अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात जे. एम. पटेल आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालय, भंडारा या संस्थेस सत्र २००५-०६ ते २००८-०९ या सत्रात समाज कल्याण विभागाकडून मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्तीसाठी जी रक्कम प्राप्त झाली आहे व ती रक्कम विद्यार्थ्यांना वाटप केलेली आहे व शिल्लक रक्कम किती आहे व रक्कम शिल्लक असून ती संबंधित विभागाला परत केली असल्यास त्या विषयीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी लक्षात घेता शासनाकडून एखाद्या संस्थेला शिष्यवृत्ती स्वरुपात जी रक्कम प्राप्त होते त्याबाबतची माहिती सामान्य व्यक्तिला उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. त्यामुळे संस्थेचा कारभार हा पारदर्शकतेप्रमाणे चाललेला आहे याची जाणीव देखील सर्व सामान्य व्यक्तिला होणे आवश्यक आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीची माहिती देखील उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात अपीलकर्त्याने श्री. डी. एस. कढव, हे त्यांचे महाविद्यालयात अधिव्याख्याता या पदावर कार्यरत आहेत. तथापी या महाविद्यालयाच्या प्रशासनाने त्यांना निलंबित केलेले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. म्हणून त्यांच्या संदर्भात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्या विभागीय चौकशीवर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता आहे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या या मुद्यांबाबत म्हणणे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

च्या कलम ८(१)(ज) अन्वये विभागीय चौकशीच्या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे ही बाब लक्षात घेता श्री. डी. एस. कढव यांची विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक १ ची जी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे निरिक्षण करु देण्यासाठी अपीलकर्त्यास दस्ताऐवज उपलब्ध करुन द्यावेत. त्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दस्ताऐवजाचे निरिक्षणाची तारीख व वेळ हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांत कळवावी व त्यानंतर अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून मुद्या क्रमांक १ च्या दस्ताऐवजाचे निरिक्षण करुन घ्यावे.

२) अपीलकर्त्याच्या मुद्या क्रमांक २ च्या संदर्भातील माहितीबाबत संस्थेस सन २००५-०६ ते २००८-०९ या वर्षात शासनाकडून किंवा समाज कल्याण विभागाकडून जी शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली आहे ती माहिती व त्याच्या वाटपाची माहिती आणि काही रक्कम शिल्लक असल्यास त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसात उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भातील श्री. डी. एस. कढव, अधिव्याख्याता यांची विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपीलकर्त्याने त्यांच्या संबंधात मागितलेल्या माहितीपैकी जनमाहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

४) जनमाहिती अधिकारी व अपीलकर्ता यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०२३- १०२५ /२८.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३०/२०११.**

श्री. अलीम खाँन वल्द सलीम खाँन,
क्वॉर्टर नं. १८६/४, सोमवारी क्वॉर्टर,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस अधिक्षक,
ता. जि. नांदेड.

श्री. बी. जे. फुले,
जनमाहिती अधिकारी तथा,
पोलीस उपनिरिक्षक,
सहाय्यक पोलीस अधिक्षक,
ता. जि. नांदेड. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. टी. डी. राठोड, पोलीस निरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधिक्षक, नांदेड यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन पोलीस निरिक्षक विजय नागोराव डोंगरे नांदेड जिल्हयात सन २०११-१२ मध्ये कोणत्या पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत आहेत यांची माहिती

... २

मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांना दिनांक ६.४.२०११ च्या पत्राने अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, पोलीस निरिक्षक श्री. विजय नागोराव डोंगरे हे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये नांदेड जिल्हयाच्या आस्थापनेवर नेमणुकीस नव्हते अशी माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. तथापी अपीलकर्त्याने आयोगासमोर सुनावणीचे वेळी असे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखाली पोलीस महासंचालक, मुंबई कार्यालयाकडे श्री. विजय नागोराव डोंगरे यांचे नेमणुकीबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना पोलीस महासंचालक, मुंबई कार्यालयातून जनमाहिती अधिकारी यांनी १८.१.२०११ च्या पत्राने अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, पोलीस निरिक्षक, श्री. विजय नागोराव डोंगरे हे पोलीस अधिक्षक, नांदेड यांच्या अधिपत्याखालील नांदेड जिल्हयामध्ये कार्यरत आहेत असे त्यांना पोलीस महासंचालक कार्यालयाकडून माहिती मिळालेली आहे.

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १६.३.२०११ चा माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना दिनांक ७.४.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्या माहितीमध्ये पोलीस निरिक्षक श्री. विजय नागोराव डोंगरे हे सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये नांदेड जिल्हयाच्या आस्थापनेवर नेमणुकीस नव्हते अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास पोलीस निरिक्षक, श्री. विजय नागोराव डोंगरे हे पोलीस अधिक्षक, नांदेड यांच्या अधिपत्याखालील नांदेड जिल्हयामध्ये कार्यरत आहेत असे कळविले आहे. तथापी त्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही म्हणून आयोगासमोर अपीलकर्त्याने पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या दिनांक १८.१.२०११ च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. म्हणून याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस महासंचालक, मुंबई कार्यालयाशी त्वरित संपर्क साधून त्यांचेकडील दिनांक १८.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत खात्री करावी व सद्यःस्थितीत श्री. विजय नागोराव डोंगरे, पोलीस निरिक्षक यांच्या सध्याच्या नेमणुकी विषयी माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडील दिनांक १८.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबतची खात्री करुन घेऊन अपीलकर्त्यास श्री. विजय नागोराव डोंगरे, पोलीस निरिक्षक यांची कार्यस्थळाबाबतची माहिती किंवा वस्तुस्थिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-      दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३१/२०११.**

श्री. प्रेमलाल साजनदास बसंतानी,
गुरुनानक वार्ड, ता. हिंगणघाट, जि. वर्धा - ४४२ ३०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. का. तु. सातकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (नवि-१८),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. सि. फ. मोकाशी,
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १७.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-१८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सदर अर्जामध्ये अर्जदाराने हिंगणघाट, नगरपरिषद, जि. वर्धा येथील सन २००५-२००६ च्या लेखापरिक्षण अहवालाचे अनुषंगाने शासनाने दिनांक ८.१२.२००९ नुसार दिलेली स्थगिती केंव्हा उठविणार व यासाठी १ वर्षापेक्षा जास्त

... २

कालावधी झाल्यामुळे या विलंबास कोण अधिकारी जबाबदार आहे या विषयी त्यांनी माहिती विचारली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.२.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपण सदर अर्जाद्वारे माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) अन्वये अभिलेख, दस्तऐवज, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, कागदपत्रे इत्यादी विषयी माहिती मागविणे अपेक्षित आहे. तथापी आपण मागितलेली माहिती कलम २ (च) नुसार नसल्यामुळे ती देता येत नाही असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २२.२.२०११ रोजी उपसचिव (नवि-१८), नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १७.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २५.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) या व्याख्येत बसत नसल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ८.२.२०११ च्या पत्राने कळविले. कारण सदरच्या माहितीचा अर्जात अपीलकर्त्याने प्रस्तुत प्रकरणात स्थगिती केंव्हा उठविणार अशी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली होती. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) अन्वये अभिलेख, दस्तऐवज, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, कागदपत्रे इत्यादी विषयी माहिती मागविणे अपेक्षित आहे. मात्र अपीलकर्त्याने स्थगिती केंव्हा उठविणार अशी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितल्यामुळे ती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ८.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देऊन सदर प्रकरण हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्यामुळे याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल असे अपीलकर्त्यास सांगितले. सदर खुलाश्याने अर्जदाराचे समाधान झाल्यामुळे प्रथम अपील खारीज केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४.    अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही स्थगिती केंव्हा उठविणार अशी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अभिलेख, दस्तऐवज अपीलकर्त्याने मागितलेले नाही. म्हणून माहितीच्या अधिकारात कलम २(च) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ८.२.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०२९- १०३१ /२८.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३३/२०११ व अपील क्रमांक ९३४/२०११.**

श्री. प्रशांत अशोक सत्राळकर,
ऑल सेंट हाऊस कंपाऊंड,
व्ही.सी.ए.समोर, सदर, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. शिरिष सरोदे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
गिरीपेठ, नागपूर.

श्री. ते. श्रा. तिडके,
जनमाहिती अधिकारी तथा,
नियोजन अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
गिरीपेठ, नागपूर.

श्रीमती प्रिया चौहाण,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
गार्डीनर हायस्कूल,
सिव्हील लाईन, नागपूर.

श्रीमती रचना सिंग,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल,
सिव्हील लाईन, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केलेली दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

... २

अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. दोन्ही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच आहेत व दोन्ही अपीलामध्ये दोन शाळांच्या दोन मुख्याध्यापिका हया जनमाहिती अधिकारी आहेत. म्हणून या दोन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २०.१.२०११ रोजी माहितीच्या अधिकाराखाली दोन स्वतंत्र अर्ज करुन जनमाहिती अधिकारी तथा नियोजन अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचेकडे अर्ज सादर करुन गार्डीनर हायस्कूल व सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल, सिव्हील लाईन, नागपूर या दोन्ही शाळेचे करारनाम्याबाबत, विभागामार्फत मंजूर केलेले अंदाजपत्रकाची प्रत व संस्थेच्या दिनांक ३१.३.२००८, दिनांक ३१.३.२००९ व दिनांक ३१.३.२०१० अशी तीन वर्षाच्या ऑडिटेड स्टेटमेंटची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्रमांक ३ ची संस्थेच्या लेखा परिक्षण स्टेटमेटची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचेकडे दिनांक ९.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक २०.१.२०११ च्या दोन्ही माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर दिनांक २४.२.२०११ रोजी उपलब्ध करुन दिली व मुद्या क्रमांक ३ ची माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकांना परस्पर उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले. तथापी अपीलकर्त्याच्या मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात दोन्ही मुख्याध्यापिकांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. याचे कारण त्यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मुद्या क्रमांक ३ च्या बाबत मागितलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक हिताच्या संदर्भात नाही. तसेच सदरची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची आहे. म्हणून दोन्ही मुख्याध्यापिकांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक ३ ची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचेकडे दाखल केले त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व

सुनावणीत त्यांना असे दिसून आले की, अपीलकर्ता यांनी ३ मुद्यांवर माहिती मागितलेली असून त्यापैकी मुद्या क्रमांक १ व २ वर माहिती पुरविण्यात आलेली आहे. मात्र मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सार्वजनिक हिताच्या संबंधित नसल्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे योग्य नाही असे प्रथम अपीलाचे दोन्ही प्रकरणात निर्णय घेण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्रमांक ३ च्या माहितीच्या संदर्भात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचेकडून हया दोन्ही शाळांना जो निधी दिला जातो त्या निधी उपयोगितेच्या संदर्भात अपीलकर्त्यास माहिती पाहिजे आहे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रकल्प अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आदिवासी विभागाकडून या दोन्ही शाळांना जो निधी दिला जाते त्या निधीचा खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात येत असतात असे प्रकल्प अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्त्यास या दोन्ही शाळांना देण्यात येणाऱ्या निधीच्या संदर्भातील खर्च झाल्याबाबतच्या उपयोगिता प्रमाणपत्र प्रकल्प अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे दोन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९३३/२०११ व अपील क्रमांक ९३४/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांनी अपीलकर्त्यास आदिवासी विभागाकडून वर नमुद केलेल्या दोन्ही शाळांना दिनांक ३१.३.२००८, दिनांक ३१.३.२००९ व दिनांक ३१.३.२०१० अखेर जो निधी दिलेला आहे त्या निधीच्या संदर्भातील उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०३२- १०३४ /२८.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३२/२०११.**

श्री. जे. बी. चौहाण,
मॅमून चेंबर, गांधीबाग,
सी. ए. रोड, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित,
सी.डी.ओ.हटमेंट्स, एल.आय.सी. (योगक्षेम),
बिल्डींग समोर, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०२०.

जनमाहिती अधिकारी तथा,
वरिष्ठ व्यवस्थापक (विधी/आस्था),
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित,
सी.डी.ओ.हटमेंट्स, एल.आय.सी. (योगक्षेम),
बिल्डींग समोर, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०२०. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ व्यवस्थापक (विधी/आस्थापना) यांनी आयोगाकडे अपीलाच्या संदर्भात लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्याचे अवलोकन करण्यात आले. तसेच अपीलकर्ता यांनी कार्यालयाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्राची छाननी केली असता अपीलकर्त्याने दिनांक १३.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ

... २

व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन गोल्फकोर्स स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक तत्वाची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.५.२०११ च्या पत्राने असे कळविले की, गोल्फकोर्स मार्गदर्शकतत्वाची माहिती महामंडळाकडे उपलब्ध नाही अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसते. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहव्यवस्थापकीय संचालक यांचेकडे दिनांक ११.५.२०११ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती महामंडळाशी संबंधित नाही. तथापी पर्यटन धोरण २००६ ची प्रत अपीलकारांना पोस्टाने पाठविण्यात यावी असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढल्याचे दिसून येते.

४. प्रथम अपीलाचे निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.६.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास पर्यटन धोरण २००६ ची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३.४.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक ४.५.२०११ च्या पत्राने व प्रथम अपीलाचा निर्णयानंतर दिनांक १५.६.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०३५ - १०३६ /२८.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४०/२०११.**

श्री. रमेशकुमार मनोहरलाल बाली,
फुटाना ओली, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रविंद्र पांढरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी.
जि. नागपूर.

श्री. सुरेश रघुनाथ बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन आय.यु.डी.पी. या योजने अंतर्गत दिनांक १.४.२०१० ते दिनांक ७.१२.२०१० पर्यंत किती प्लॉट हस्तांतरण झाले तसेच त्यापैकी किती प्लॉटची रजिस्ट्री करण्यात आली व मुख्य लिपिकाला सहया करण्याचे अधिकार कोणत्या नियमानुसार दिलेले आहे अशा

... २

तीन मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे दिनांक ८.५.२०११ रोजी दाखल केले. मुख्याधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर राहून त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती पुरविलेली आहे त्यासंदर्भात रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे असा आदेश प्रथम अपीलाचे निर्णयात दिला. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २६.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने अशाच प्रकारची माहिती यापुर्वी देखील नगरपरिषदकडे मागितलेली होती. ती माहिती अपीलकर्त्यास दिनांक १५.२.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली होती. म्हणून पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक १५.२.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची प्रत अपीलकर्त्यास दिनांक ८.४.२०११ रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, मुख्य लिपिकाला लिजडिड करारावर सहया करण्याचा अधिकार कोणत्या नियमाप्रमाणे दिलेला आहे. त्याची माहिती त्यांना समाधानकारक मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर मुख्याधिकारी यांनी असे सांगितले की, मुख्याधिकारी यांचेकडे असलेल्या अतिरिक्त कार्यभारामुळे नागरिकांच्या कामात विलंब टाळावा म्हणून कामाची विभागणी करुन मुख्यलिपिकास लिजडिड करारावर सहया करण्याचा अधिकार दिलेला आहे व ही कार्यवाही त्यांना असलेल्या अधिकारानुसार त्यांनी केलेली आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलकर्त्यास त्यांचेकडील यापुर्वीच्या दिनांक ७.१२.२०१० च्या माहिती अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.२.२०११ ला जी माहिती दिलेली आहे तीच माहिती अपीलकर्ता वारंवार मागीत आहे. म्हणून अपीलकर्त्यास याबाबत जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांना दिलेल्या माहितीचे दस्तऐवज निरिक्षण करुन घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन वेळ व तारीख कळवावी. त्यानंतर दस्तऐवज त्यांनी निरिक्षण करुन घ्यावे असा निर्णय त्यांनी प्रथम अपीलात दिल्याचे आयोगापुढे नमुद केले.

... ३

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्याने प्रथम अपीलाचे निर्णयात नमुद केल्याप्रमाणे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर राहून माहितीचे निरिक्षण करुन घेणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात नमुद केल्याप्रमाणे हा आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांना दिलेल्या माहितीचे संदर्भातील आवश्यक ते दस्तऐवज निरिक्षण करुन घ्यावे. त्यासाठी अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांना लेखी तारीख व वेळ कळवावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४४/२०११.**

श्री. विजय उमराव डोंगरे,
वार्ड क्रमांक ३, पंचशील झेंडा चौक,
मु. पो. कटंगीकला, ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया, जि. गोंदिया.

श्री. ए. सी. राणे,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत, कटंगीकला,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, कटंगीकला यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्राम पंचायतीचे सन १९९५-९६ ते २००५-०६ या मुदतीची लेखा परिक्षण झालेले आहे त्या लेखा परिक्षण अहवालाच्या आक्षेपांची पुर्तता करुन अहवाल ३ महिन्याचे आंत पंचायत समितीकडे पाठविलेला नाही. म्हणून याबाबत खुलासा देण्यात यावा अशी त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.१.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १४.२.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, सन १९९५-९६ ते २००५-०६ या मुदतीची लेखा तपासणी करण्यात आलेली आहे. त्याचा पुर्तता अहवाल ३ महिन्यात सादर केलेला नाही याबाबत आक्षेपांची पुर्तता करणे सुरु आहे. सदरच्या आक्षेपांची पुर्तता अहवाल तयार झाल्यावर पंचायत समितीला सादर केल्यावर आपणास कळविण्यात येईल अशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे दिनांक ८.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ११.४.२०११ रोजी घेण्यात आली त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी लेखा आक्षेपांचे अनुपालन अहवाल तयार केल्यानंतर अपीलकर्त्यास या अनुपालनाची एक प्रत देण्यात यावी.

४. प्रथम अपीलाचे या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्त्यास दिनांक २३.९.२०११ च्या पत्राने अनुपालन अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे मान्य केले. मात्र ३ महिन्याचे मुदतीत अनुपालन अहवाल सादर केला नाही. तसेच अनुपालन अहवाल व्यवस्थित केलेला नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून याबाबत अपीलकर्त्याने योग्य त्या अधिकाऱ्यांकडे दाद मागणे संयुक्तिक होईल. तथापी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०४० - १०४१ /२९.९.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४३/२०११.

श्री. सुनिल कुमार गयाप्रसाद मिश्रा,
सेंट्रल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,
आर्शिवाद सिनेमा कॉम्प्लेक्स, ग्रेट नाग रोड, नागपूर - ४४० ००३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी
एल.ए.डी. महाविद्यालय,
शंकरनगर, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
प्राचार्य,
एल.ए.डी. महाविद्यालय,
शंकरनगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी यांचेतर्फे ॲड. श्री. रोहीत जोशी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १७.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, एल.ए.डी. महाविद्यालय, नागपूर यांना १) बॅचलर ऑफ कॉस्मटिक टेक्नालॉजी, २) बॅचलर ऑफ अप्लाईड इलेक्ट्रानिक, ३) बॅचलर ऑफ इंटिरियर डिझाइन, ४) बॅचलर ऑफ होटल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमास शासनाने केव्हा परवानगी दिली त्याची प्रत द्यावी. महाविद्यालयाने विद्यापीठाकडे नवीन अभ्यासक्रम मागणीकरिता केंव्हा अर्ज केले व विद्यापीठाने शासनाकडे केंव्हा पाठविले त्याची प्रत द्यावी. सदर महाविद्यालयास प्रथम संलग्नीकरण केंव्हा देण्यात आले याकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाची प्रत द्यावी.

अशा ३ मुद्यांची त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ५.५.२०११ च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. उत्तरवादी यांचेवतीने उपस्थित असलेले अॅड. रोहीत जोशी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १७.४.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.५.२०११ च्या पत्राने त्यांचेकडे असलेल्या १ ते ३ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.५.२०११ च्या पत्राने जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे तिचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मुद्या क्रमांक १ व २ मध्ये वर नमुद केल्याप्रमाणे ४ अभ्यासक्रमाला शासनाने दिलेल्या परवानगीची प्रत त्यांनी मागितलेली आहे. तथापी त्या मुद्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अशी माहिती दिली आहे की, विद्यापीठाचे ऑर्डीनन्स क्रमांक १/१९९५, २/१९९५, ३/१९९५ व ४/१९९५ प्रमाणे हे अभ्यासक्रम चालू आहे. तथापी शासनाने या ४ ही अभ्यासक्रमाला स्वतंत्र परवानगी दिलेली नाही. म्हणून याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी शासनाचे परवानगीबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ च्या बाबत वर नमुद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती स्पष्टपणे रजिस्टर पोस्टाद्वारे कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०४२ - १०४३ /२९.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८५४/२०११.**

श्री. सुनिल कुमार गयाप्रसाद मिश्रा,
सेंट्रल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,
आर्शिवाद सिनेमा कॉम्प्लेक्स, ग्रेट नाग रोड, नागपूर - ४४० ००३. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रदिप बिनीवाले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. सतीश साधनकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
उच्च श्रेणी लिपिक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. राकेश कोपुलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
कुलसचिव कार्यालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. मनिष झोडपे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक कुलसचिव (आस्था),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना

आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी अपीलकर्ता यांनी मुदतवाढीचा अर्ज दिला असल्यामुळे दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी कुलगुरुचे कार्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर रोस्टर प्रकरणाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या माजी न्यायमुर्ती लोणे समितीने आपला अहवाल विद्यापीठास केंव्हा सादर केला त्या अहवालाची प्रत द्यावी. मा. कुलगुरु यांनी माजी न्यायमुर्ती लोणे समितीच्या अहवालावर कोणती कार्यवाही केली. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधानसचिव, श्री. व्ही. सी. मिना यांनी विद्यापीठाच्या शिक्षक संवर्गातील पदाकरिता आपला अहवाल विद्यापीठास सादर केलेला आहे त्या अहवालाची प्रत द्यावी अशी तीन मुद्यांवर माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना श्री. व्ही. सी. मिना यांच्या अहवालाची प्रत प्राप्त झाली. मात्र माजी न्यायमुर्ती श्री. लोणे यांच्या अहवालाची प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव (आस्था) यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी त्यांचे विभागाशी संबंधित असलेली श्री. व्ही. सी. मिना, प्रधानसचिव यांचा अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी कुलसचिवांचे कार्यालय यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागणी केलेली माजी न्यायमुर्ती श्री. लोणे समितीच्या अहवालावर कार्यवाही सुरु आहे व कार्यवाही झाल्यानंतर त्या अहवालाची प्रत संबंधितांना देण्यात येईल असे कुलसचिवांनी त्यांना लेखी आदेश दिल्यामुळे अपीलकर्त्यास न्यायमुर्ती श्री. लोणे समितीच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. वास्तविक पाहता न्यायमुर्ती श्री. लोणे समितीने नागपूर विद्यापीठातील रोस्टर प्रकरणाचे संदर्भात चौकशी

करुन जो अहवाल दिलेला आहे तो अहवाल कोणत्याही प्रकारे गोपनीय स्वरुपात दिसून येत नाही. म्हणून सदरचा अहवाल व्यापक जनहिताच्या दृष्टिकोणातून माहिती अधिकाराखाली अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने सदरच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्यासाठी कुलसचिवांनी सदरच्या अहवालाची प्रत त्वरित जनमाहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरण करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी न्यायमुर्ती श्री. लोणे समितीच्या अहवालाची प्रत कुलसचिव यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०४४-१०४६ /२९.९.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४२/२०११.

श्री. सुनिल कुमार गयाप्रसाद मिश्रा,
सेंट्रल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,
आर्शिवाद सिनेमा कॉम्प्लेक्स, ग्रेट नाग रोड, नागपूर - ४४० ००३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. फु. ख. भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

श्री. रमण मदने,
जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक (महाविद्यालयीन शाखा),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (महाविद्यालयीन शाखा) राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्रीमती शिला कुलकर्णी यांची कॉस्मॅटीक टेक्नालॉजीच्या लेक्चररपदी नियुक्ती करण्यात आली

... २

त्या जाहिरातीची प्रत द्यावी तसेच त्यांच्या बाबतच्या मंजूरीची प्रत व इतर माहिती बाबत एकूण ५ मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांचा सदरचा माहितीचा अर्ज दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी एल.ए.डी.महाविद्यालय, नागपूर यांचेकडे हस्तांतरण केला व सदरची माहिती महाविद्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र त्यांना महाविद्यालयाकडून माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक कुलसचिव यांचेकडे दिनांक १७.३.२०११ रोजी दाखल केले. सहाय्यक कुलसचिवांनी माहितीचा शोध घेण्याचे आदेश प्रथम अपीलाचे निर्णयात दिला. तथापी त्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ३०.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. सदर अर्जातील माहितीचा शोध घेतल्यानंतर अभिलेख सापडत नसल्याने सदर माहिती एल.ए.डी. महाविद्यालयात उपलब्ध होऊ शकेल या कारणाने दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी एल.ए.डी. महाविद्यालय, नागपूर यांना अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक कुलसचिव यांचेकडे दाखल केले. सहाय्यक कुलसचिवांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिला व प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात सदरच्या माहितीच्या नस्तीचा पुन्हा शोध घेऊन ८ दिवसांचे आंत माहिती पुरविण्याचे आदेश दिले. तथापी नस्ती न मिळाल्यास तशी वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविण्यात यावे असे देखील आदेश प्रथम अपीलाचे निर्णयात दिले.

४. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा त्यांच्या कार्यालयात सदरच्या नस्तीचा शोध घेतला. परंतु सदरची नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २३.५.२०११ च्या पत्राने नस्ती उपलब्ध होत नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २८ वर्षापुर्वीची असल्यामुळे सदरची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध झालेली नाही व ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे २८ वर्षापुर्वीची असल्यामुळे माहिती उपलब्ध होऊ शकती नाही व ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४१/२०११.**

श्री. सुनिल कुमार गयाप्रसाद मिश्रा,
सेंट्रल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,
आर्शिवाद सिनेमा कॉम्प्लेक्स, ग्रेट नाग रोड, नागपूर - ४४० ००३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. अजीत देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण),
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. रविंद्र चोपडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रशासन अधिकारी,
सहसंचालक (उच्च शिक्षण),
नागपूर विभाग, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
प्राचार्य,
एल.ए. डी. महाविद्यालय,
शंकरनगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन एल.ए.डी. महाविद्यालयाच्या श्रीमती शिला कुलकर्णी यांची कॉस्मॅटीक टेक्नालॉजीच्या लेक्चररपदी नियुक्ती बाबत तसेच एल.ए.डी. महाविद्यालयाला दिलेल्या अनुदानाबाबत इत्यादी संदर्भात एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.४.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती महाविद्यालयाशी संबंधित असल्याने सदर माहिती संबंधित महाविद्यालयाकडे शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी. तथापी त्यांना महाविद्यालयाकडून कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक २७.४.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील खारीज केल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ३०.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती एल.ए.डी. महाविद्यालय, शंकरनगर, नागपूर यांचेशी संबंधित असल्याने सदरच्या माहितीचा अर्ज प्राचार्य, एल.ए.डी.महाविद्यालय, नागपूर यांचेकडे दिनांक ६.४.२०११ च्या पत्राने हस्तांतरण करुन प्राचार्य यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले व संबंधित महाविद्यालयाने अपीलकर्त्यास दिनांक ५.५.२०११ व दिनांक ७.५.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी अपीलकर्त्यास पुर्ण माहिती मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्याचे याबाबत असे म्हणणे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती ही सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाशी संबंधित आहे. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २९.३.२०११ च्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २ मधील मागितलेली माहिती ही शासनाने एल.ए.डी. महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दिलेल्या अनुदानाबाबत माहिती मागितलेली आहे. म्हणून याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डनुसार एल.ए.डी. महाविद्यालयाला वेतनापोटी दिलेले अनुदानाची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात श्रीमती शिला कुलकर्णी यांच्या पद मान्यतेबाबतची वस्तुस्थिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक २ ची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या वर्षापासून विनामुल्य द्यावी.

३) त्याचप्रमाणे श्रीमती शिला कुलकर्णी यांच्या मान्यतेबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

४) सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४८/२०११.

श्री. अरविंद तुलाराम लोधी,
वार्ड नं. २, सिव्हील लाईन,
ता. सावनेर, जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती अर्चना मेंढे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. आर. पांडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कडील दिनांक २४.८.२०१० व दिनांक २४.३.२०११ च्या पत्रान्वये नगर परिषद, सावनेरने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १३.५.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सागितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्याचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दिनांक २९.७.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाल्यावर प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व निर्णय दिनांक २०.७.२०११ रोजी देण्यात आला. जनमाहिती अधिकारी श्री. पी. आर. पांडे व श्री. ए. बी. चरपे यांनी अपीलकर्त्यास महिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केल्यामुळे त्यांचेवर प्रत्येकी रुपये १००/- प्रमाणे दंडाची कार्यवाही करण्यात आली व त्याप्रमाणे संबंधितांकडून दंड वसुल केला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सागितले.

५. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २९.७.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना दंडही केलेला आहे म्हणून विलंबाबद्यल पुन्हा दंड लादणे संयुक्तिक होणार नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबत त्यांची पुनर्वृत्ती करु नये याची समज त्यांना देण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४९/२०११.**

श्री. संतोषकुमार दामोधरप्रसाद तिवारी,
वार्ड नं. ४, ता. देवरी, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया.

डॉ. प्रकाश नागपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
तालुका वैद्यकीय अधिकारी,
ता. देवरी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. मात्र जनमाहिती अधिकारी तथा तालुका वैद्यकीय अधिकारी, देवरी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्रापत झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संकलन करण्यास वेळ लागेल म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १४.३.२०११ च्या पत्राने उत्तर पाठवून असे

... २

कळविले की, आपण मागितलेली माहिती संकलीत करण्यात येत असून माहिती उपलब्ध होण्यास विलंब लागेल. त्यानंतर माहिती संकलीत करण्यात आली व दिनांक ६.४.२०११ रोजी अपीलकर्त्याच्या पत्त्यावर शिपायामार्फत माहिती पाठविली असता त्यांचे घर बंद होते म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही. कारण अपीलकर्त्याने व्यक्तिशः माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचेकडे तयार आहे म्हणून अपीलकर्ता व्यक्तिशः माहिती घेण्यास आल्यावर त्यांना माहिती देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात व्यक्तिशः हजर राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०५६- १०५७/२९.९.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५०/२०११.**

श्री. किशोर त्र्यंबकराव देशमुख,
श्रीहरी कॉलनी, साईनगर,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एम. पाचभाई,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी, मौजा - नारी,
तहसील कार्यालय नागपूर शहर, नागपूर.

श्री. प्रशांत नागुलवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
तलाठी, मौजा - नारी,
तहसील कार्यालय नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.८.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी अपीलकर्त्याने पुढील तारीख मागितल्यामुळे दिनांक २९.९.२०११ रोजी अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक ८.३.२०११ चे अर्जानुसार फेरफार पंजीची प्रत व ७/१२ मौजा नारी वारसा नोंद अशी माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२०११ रोजी सुनावणीच्या वेळी आयोगापुढे

... २

सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. त्याबाबत त्यांनी लेखी निवेदन दिले. माहिती बाबत त्यांचे समाधान झाले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ १०५८- १०५९/२९.९.२०११